# संपादकीय

ग्रंथपालनाचे क्षेत्र सतत व्यापक होत आहे. त्यामध्ये विविध बाजूंनी विकास होत आहे. तसेच माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे या क्षेत्रास आव्हानही निर्माण झाले आहे; तसेच सुविधाही झाली आहे. ग्रंथपालनाच्या व्यापकतेचा, विकासाचा विचार केला तर औद्योगिक ग्रंथपालन व माहिती पद्धती, कृषि-ग्रंथपालन, वैद्यकीय ग्रंथपालन, इत्यादी नवनवीन शाखा विकसित होत आहेत. स्थानिक नागरिकांच्या त्यांच्या गावाबद्दलची माहितीची उत्सुकता भागविण्यासाठी स्थानिक अभ्यास ग्रंथपालन (Local Studies Librarianship) अशीही शाखा विकसित होत आहे. ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीस पूरक कार्य म्हणून माहितीसाक्षरतेचा प्रसार ग्रंथालये करत आहेत.

वरील सर्व बदलाबरोबरच इंटरनेट व इतर डिजिटल माहितीसाधनांच्या सहज उपलब्धतेमुळे प्रत्यक्ष ग्रंथालयातील माहितीसाधनांचा वापर कमी होत आहे का याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. तसे होत असेल तर माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयांनी आपल्या सेवा आणखी सक्षम केल्या पाहिजेत.

अर्थात माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करीत असताना ग्रंथालयांनी मूलभूत ग्रंथपालनाकडे (Core Librarianship) दुर्लक्ष करता कामा नये. मूलभूत ग्रंथपालन यालाच कदाचित पारंपरिक ग्रंथपालन असेही म्हणता येईल. देवघेव सेवा, वर्गीकरण, तालिकीकरण, संदर्भसेवा या मूलभूत सेवा/कार्ये आहेत. या सेवा अधिक सक्षम करूनच आपण ग्रंथपालन व्यवसायास स्थिरत्व (Sustainability) देऊ शकतो.

❑❑❑



# ग्रंथपालनाची नैतिकता व आचारसंहिता

प्रा. श्री.पां. पोतदार

*या लेखात माहिती-विस्फोटाच्या युगात ग्रंथपालाची भूमिका, ग्रंथपालन व्यवसायाची प्रमुख लक्षणे, ग्रंथपालन म्हणजे काय, वाचकांच्या गरजा भागविण्याकरिता ग्रंथालय व्यावसायिकांकरिता आचारसंहितेची आवश्यकता, व्यावसायिक नैतिकता, आचारसंहितेचा विकास, संहितेतील अंतर्भूत बाबी यांचा आढावा घेण्यात आला आहे.*

आजच्या माहिती-विस्फोटाच्या युगात प्रत्येक क्षेत्रातच अद्ययावत माहितीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. ओघानेच आजची ग्रंथालये ही अद्ययावत माहिती केंद्रे असावीत ही प्रत्येकाची गरज बनली आहे. कारण प्रत्येक विषयातच भरपूर संशोधन होत आहे. त्यामुळे सूक्ष्मतम, अद्ययावत विचारांची - माहितीची भर पडत आहे. अशी माहिती संकलित, संग्रहित करून त्या माहितीचे प्रसारण करणे हे काम जेवढे तांत्रिक तेवढेच जिकिरीचे झाले आहे. सार्वजनिक, शैक्षणिक व संशोधन, व्यावसायिक, प्रतिष्ठानांची ग्रंथालये माहिती प्रसारणाचे काम जबाबदारीने पार पाडीत आहेत. या कार्यात ग्रंथपालाची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे.

ग्रंथपालन ही केवळ इतर कार्यालयांतील सेवकांच्या नोकरीप्रमाणे नसून ग्रंथपालनाच्या कार्याचे, सेवेचे आजचे स्वरूप पाहता समाजातील इतर व्यावसायिकांप्रमाणे जसे डॉक्टर, इंजिनीअर, वकील यांप्रमाणे सामाजिक दायित्व, बांधिलकी असलेल्या व्यावसायिकाचे स्वरूप ग्रंथपालनाला प्राप्त झाले आहे. त्यामुळे काळानुसार झालेला बदल ग्रंथपालांनी स्वीकारून आचरणात आणणे गरजेचे आहे.

## व्यावसायिकांची प्रमुख लक्षणे

(१) ज्यांच्या कार्यामध्ये बौद्धिकतेचा अंतर्भाव असतो. (Intellectual activities.)
(२) आपल्या व्यावसायिक तत्त्वज्ञानाचा ज्यांनी अंगीकार केला असतो. (It has a philosophy fundamental to it.)
(३) कार्यामध्ये विशेष अशा तंत्रांचा अवलंब केलेला असतो. (It has a specialised professional techniques.)
(४) ज्यांनी व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेले असते. (It needs specialised professional training.)

(५) ज्यांची स्वत:ची आचारसंहिता असते व प्रत्येकाने त्या आचारसंहिते प्रमाणे वागावे, असे सर्वांवर बंधन असते. (It has its own code of conduct.)

(६) समाजामध्ये सर्व व्यावसायिकांना एक सामाजिक दर्जा प्राप्त असतो. (It has recognised status to its members)

(७) अशा व्यावसायिकांचा संघ (Association) असतो की संघटना (Union) नसते. सर्व व्यावसायिक अशा संघाचे सभासद असतात. (It has an organisation of people.) उदा. Indian Medical Association, Institution of Engineers (India), Indian Library Association.

(८) व्यवसायामध्ये प्रवेश करण्याकरिता प्रशिक्षणाकरिता, शैक्षणिक गुणवत्तेची प्रमाणके निर्धारित केलेली असतात. (Sets certain standards for entry in to trainining schools as also in the profession.)

(९) व्यवसायाची काही मानके, प्रमाणके निर्धारित केलेली असतात, जी प्रत्येकाने आचरणात आणणे बंधनकारक असते. (It imposes certain responsibilities to each member.)

(१०) व्यक्तिगत स्वार्थापलीकडे जाऊन समाजसेवेचे बंधन पाळावे लागते.

वरील सर्व गुणवैशिष्ट्ये सर्वच व्यावसायिकांसाठी निर्धारित केलेली आहेत. ग्रंथपालन हाही एक व्यवसायच असल्याने ही सर्व गुणवैशिष्ट्ये ग्रंथपालन व्यवसायाला लागू आहेत. (It practiced as a permanent calling and leads to a service above personal gain.)

## ग्रंथपालन म्हणजे काय ?

डी.जे. फॉस्केट यांच्या मते, ग्रंथपालनाचे तत्त्वज्ञान हे डॉ. रंगनाथन यांच्या ग्रंथालयाची पाच सूत्रे यात अंतर्भूत आहे. ग्रंथपालन हे स्वनियंत्रित कार्य आहे. आचारसंहिता सर्व व्यावसायिकांना सांघिकरित्या त्यांची भूमिका कशी राहील याचे मार्गदर्शक आहे. प्रत्येकाने आपल्या आचारसंहितेचे गांभीर्याने पालन करावे व त्याचे पालन न करणाऱ्यावर कार्यवाहीद्वारे अंकुश ठेवते.

जे. ब्रेकर यांनी त्यांच्या लेखात अशी टीका केली आहे, की ग्रंथपाल हे वैचारिक स्तरावर बराच विचार करतात, पण त्यांपैकी फारच कमी गोष्टी ते आचरणात आणतात.

या उक्तीचा अनुभव आपल्याला भारतातील नियतकालिकांच्या संघसूचीच्या प्रकल्पावरून दिसून येतो. नियतकालिकांच्या संघसूचीचा उपयोग व महत्त्व संशोधकाच्या दृष्टीने काय आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पण INSDOC व NASDOC या संस्थांनी भारतातील सर्व शैक्षणिक व संशोधन संस्थांमधील उपलब्ध असलेल्या नियतकालिकांच्या संघसूचीचा प्रकल्प हाती घेतला होता, त्या वेळी फारच कमी ग्रंथपालांनी या प्रकल्पाला प्रतिसाद दिला. पर्यायाने नियतकालिकांच्या व्यापक संघसूची



तयार होऊ शकल्या नाहीत. आजही INFLIBNET च्या प्रकल्पाबाबत असेच चित्र दिसून येते. यावरून ब्रेकर यांचे मत आजही भारतात अनुभवास येते. दीडशे वर्षांची परंपरा असलेला ग्रंथालय व सहकाराचा भारतात पूर्णत: बोजवारा वाजला. त्यानंतर गेल्या पन्नास वर्षांत गाजावाजा झालेला साधनसहभागाचे तीन तेरा झाले. आता ग्रंथालय नेटवर्क्स व कन्सोर्शियाचा बोलबाला आहे. पण याचे जाळे अजून तरी लहान ग्रंथालयापर्यंत पोचलेले नाही. खऱ्या अर्थाने याचा अवलंब व्हावा असे जर कुणाला वाटत असेल तर त्यासाठी आपली सर्वांची मानसिकता बदलली पाहिजे. ग्रंथपालन ही नोकरी नसून ते एक समाजकार्य आहे, याचा वसा मी चालवीन. याची आचारसंहितेमध्ये नोंद घेऊन तशी प्रत्येकाने शपथ घेतली पाहिजे. ज्यांनी हे केले त्यांची ग्रंथालये समृद्ध झालीत व अशा ग्रंथपालांनी नावलौकिक प्राप्त केले.

## वाचकांच्या गरजा पुरविण्यासाठी आचारसंहिता

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ग्रंथपाल हा शिक्षकाचा शिक्षक आहे असे म्हटले आहे. त्यांच्या मते, समाजात ग्रंथपालाबाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत. म्हणून ग्रंथपालांनी आपली जबाबदारी ओळखून माहितीचा मुक्त प्रवाह समाजापर्यंत पोचविला पाहिजे. वाचकांना वाचनाकरिता एकांत, माहितीचा मुक्त प्रवाह, बिनचूक माहितीचा पुरवठा, तोही गोपनीयतेने, भेदभाव न करता ग्रंथपालाने त्यांच्या व्यावसायिक ज्ञानाचा उपयोग करून घ्यावा असे त्यांचे ग्रंथपालनाबाबतचे मत आहे. ग्रंथपालनाचा मुख्य उद्देशच असा आहे की, योग्य वाचकाला योग्य माहिती पुरविणे, म्हणून हे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरविण्याकरिता ग्रंथपालनाच्या आचारसंहितेची व ती अमलात आणण्याची आवश्यकता आहे. वाचकांच्या ग्रंथालय व ग्रंथपालांकडून मिळणाऱ्या सेवा, सुविधा व मदतीबाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्याकरिता ग्रंथपालाने स्वत:ला अद्ययावत ठेवायला हवे. नवीन विषयांचे ज्ञान, नवीन तंत्र, नवीन पद्धतीचे ज्ञान प्राप्त करायला हवे. विशेष गुण, काही तरी नवीन करण्याची मानसिकता जोपासायला हवी. जेव्हा ग्रंथपाल असे विशेष गुण, पात्रता, कर्तृत्व धारण करेल तेव्हा तो समाजाच्या बदलत्या गरजा निश्चितच पूर्ण करू शकेल.

## ग्रंथपालन हा एक व्यवसाय आहे

व्यवसाय म्हणजे- "A vocation that involves some branch of advance learning or science", आणि "Ethics means a set of principles of moral." म्हणून Code of ethics म्हणजे नैतिक नियमांचा संच होय; ज्याचे पालन प्रत्येक व्यावसायिकाने आपल्या आचरणात करावयाचे आहे. Profession is a occupation or vocation requiring advanced study in specialised field. केम्ब्रिज डिक्शनरी ऑफ अमेरिकन इंग्लिशप्रमाणे व्यावसायिक म्हणजे जे कार्य पार पाडावयाचे आहे त्याचे शिक्षण व त्या क्षेत्राच्या कार्याची निपुणता धारण करणारा

होय. म्हणून ग्रंथपाल हा प्रशिक्षित, उच्च शिक्षित असतो व वाचकांना समर्पणाच्या भावनेने सेवा प्रदान करणारा असतो. ग्रंथपाल हा समाजसेवक असून त्याच्या नेतृत्वगुणांमुळे समाजात कुशाग्रबुद्धी व एकी निर्माण करण्याच्या कार्यात तो मदत करतो. म्हणूनच समाजात त्याच्या कार्यामुळे तो व्यावसायिक म्हणून ओळखला जातो.

बी. एम. हेडीकर यांच्या मते, व्यवसाय म्हणजे केवळ अर्थार्जनाकरिता एकत्र येऊन एखादे विशिष्ट प्रकारचे काम करणाऱ्या व्यक्तींचा समूह किंवा सभासदांना संरक्षण देणारा व्यक्तींचा समूह नसून, अशा व्यक्तींचा समूह आहे की जो आपले कार्य पार पाडत असताना आपल्या आदर्श नियमांचा दर्जा पाळतो; आणि (अ) आपल्या सर्व व्यावसायिक बांधवांना व्यावसायिक संरक्षण देतो, व (ब) समाजाला चांगली सेवा पुरवितो. ग्रंथपालन व्यवसाय हा ह्या सर्व बाबी पूर्ण करतो; म्हणून ग्रंथपालन हा एक व्यवसाय आहे. म्हणून ग्रंथपालन व्यवसायात त्यांनीच प्रवेश करावा ज्यांना ही सामाजिक बांधीलकी मान्य आहे; ती आचरणात आणण्याची मानसिकता आहे व वाचकांना सेवा देण्याची तळमळ आहे.

जॉन बेकर यांनी ग्रंथपालनाची नैतिकता व आचारसंहिता यावर सखोल संशोधन केले आहे. त्यांच्या मते, व्यवसायाची नैतिकता हा विषय तसा गहन आहे. कारण नैतिकतेचे नियम व त्यांचा आचार व त्यांची संहितेमध्ये समावेश करणे व कार्यपालनामध्ये अवलंब करणे ही एक जटिल व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यांच्या मते, कोणत्याही व्यावसायिकाची काही गुणवैशिष्ट्ये सांगता येतील की ज्यात प्रदीर्घ प्रशिक्षण, कार्याचे कौशल्य, सेवाप्रधान, स्वयंस्फूर्ती व स्वातंत्र्य ह्याला प्राधान्य राहील. व्यवसायाला समाजातील मान्यता मिळण्याकरिता स्वत:करिता आदर्श नैतिक प्रमाणके तयार करून त्याचे आचरण करावे किंवा अशी नैतिक नियमावली तयार करून स्वत: त्याचे पालन करावे.

बेकर यांनी ग्रंथपालनाच्या आचारसंहितेची अनुक्रमणिका तयार करण्यासाठी अतिशय पद्धतशीरपणे मार्गदर्शक व समर्पक सूचना केल्या आहेत. ते म्हणतात, की जेव्हा आपण आचारसंहिता तयार करतो तेव्हा आपण ग्रंथपालनाच्या कार्याचे प्रथम विश्लेषण करायला हवे व ग्रंथपालनाच्या समाजाप्रती भूमिकेचा विचार करायला हवा. जेव्हा आपल्या हे लक्षात येते, की आपण वाचकांकरिता काय काय करतो, तेव्हा ही कार्ये अधिक चांगल्या पद्धतीने कशी करता येतील त्याचा संहितेत समावेश करावा. तसेच ग्रंथालयसेवा अधिक प्रभावी कशी करता येईल याचा त्यात समावेश केला जावा. त्यांच्या मते, कोणताही व्यवसाय समाजाची गरज पूर्ण करण्यासाठी विशिष्ट ध्येय-उद्दिष्टाने प्रेरित होऊन केला जातो. त्यामुळे ग्रंथपालन व्यवसायालादेखील ही बाब लागू आहे. ग्रंथपालन व्यवसाय हा खालील नैतिक प्रमाणके साध्य करण्यासाठीच कार्य करतो.

(१) आपण स्वत:शी आपल्या कामाप्रती, संस्थेप्रती, आपल्या व्यावसायिकांप्रती,



समाजाप्रती प्रामाणिक असावे. (Loyalty to one's own work, institution, fellow professionals community, and self.)

(२) आपली समाजातील प्रतिमा चारित्र्यवान व्यक्तीसारखी असावी. (Integrity of character.)

(३) ग्रंथालयाच्या कामात सहकार्य व एकसंघ कार्य करण्याची वृत्ती जोपासावी. (Co-operation and team spirit in library work.)

(४) आपल्या कामाप्रती समर्पण (Devotion to duty.)

(५) वाचकांशी होणाऱ्या व्यवहारांमध्ये भेदभाव नसणे व चांगली वागणूक देणे. (Impartiality and fairness in dealing with users.)

(६) कायद्याची / नियमांची बांधीलकी असावी. (Allegiane to the law.)

(७) स्वत:पेक्षा सेवेला महत्त्व (Service above self.)

## व्यावसायिक नैतिकता

नैतिकता म्हणजे जीवनातील चांगलेवाईट काम हे सांगणारी संकल्पना आहे. नैतिक मूल्ये ही समाजाच्या भल्याकरिता ज्या ज्या गोष्टी आहेत त्यांवर आधारित असतात.

प्रमाणे नैतिकता हे सदसद्विवेकबुद्धीचे शास्त्र आहे. ही एक तत्त्वज्ञानाची शाखा आहे, ज्यात माणसाचे चारित्र्य व वर्तणूक यांचा अंतर्भाव होतो.

सर्वच व्यवसायांच्या नैतिक आचारसंहिता आहेत, ज्यात प्रामुख्याने त्या व्यवसायाचे धोरण, वर्तणूक याबाबत मार्गदर्शक तत्त्वे सांगितली असतात. त्यांचा आपले कार्य पार पाडताना अवलंब करायचा असतो व सेवा देताना सर्वांना समान वागणूक मिळावी म्हणून प्रत्येकाने अवलंब करणे अपेक्षित असते. आपल्या व्यवसायाचा दर्जा टिकविण्यासाठी व नैतिक मूल्यांचा आपल्या दैनंदिन कार्यात अवलंब करताना सुस्पष्टता राखता येईल. प्रामुख्याने प्रत्येक व्यवसायाचे संघ आपल्या व्यावसायिकांसाठी अशी नैतिक मूल्यांवर आधारित आचारसंहिता तयार करतात.

व्यवसायाची नैतिक आचारसंहिता हा एक स्वत:करिता तयार केलेल्या व स्वत:च लागू केलेल्या नियमांचा संच असतो. अशी तत्त्वे प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी त्याला सर्वांच्या नैतिक सहमतीचा आधार असतो.

ग्रंथपालनाच्या आचारसंहितेमध्ये डॉ. एस. सीथारामा यांनी खालील बाबींचा अंतर्भाव असावा असे सुचविले आहे.

(१) व्यावसायिकाची कार्यक्षमता (Competence of the professional),

(२) व्यावसायिकाची सचोटी (Integrity of the memeber),

(३) आर्थिक नैतिकता (Financial Ethics),

(४) शिक्षणातील नैतिकता (Ethics in Teaching),
(५) संशोधनातील नैतिकता (Ethics in Research),
(६) माहितीकार्यातील नैतिकता (Ethics in Information activity),

## ग्रंथपालनाच्या नैतिक आचारसंहितेचा विकास

विसाव्या शतकात आचारसंहितेची संकल्पना अस्तित्वात आली. सुरुवातीला अमेरिका, इंग्लंड या देशांमध्ये ग्रंथपालनाची आचारसंहिता अस्तित्वात आली. त्यामध्ये समाजाप्रती ग्रंथपालाच्या जबाबदाऱ्यांचा मात्र समावेश नव्हता. केवळ संकीर्ण बाबींचाच त्यात समावेश होता. अशी पहिली संहिता १९३० मध्ये अस्तित्वात आली. त्यानंतर १९७५ मध्ये अमेरिकन लायब्ररी असोसिएशनने ग्रंथपालनाची आचारसंहिता विकसित केली, ज्यात खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आला.

(१) माहितीचा मुक्त प्रवाह (Free flow of Information),
(२) वाचकांना एकांत (Privacy of Patrons),
(३) संस्थेच्या आर्थिक व्यवहारातून वैयक्तिक लाभ टाळावा (Avoidance of Personal financial gain at the expense of the employing institution).

अमेरिकन लायब्ररी असोसिएशनने तयार केलेल्या आचारसंहितेमध्ये खालील संबंधांवर विशेष भर दिला आहे.

(१) ग्रंथपालाचे व्यवस्थापनाशी संबंध (Relation of the Librarian to the Governing Authority),
(२) ग्रंथपालाचे त्या परिसरातील वाचकांशी संबंध (Relation of the Librarian to his constituency),
(३) ग्रंथपालाचे ग्रंथालयातील वाचक व त्याच्या सहकाऱ्यांशी संबंध (Relation of the Librarian within his library),
(४) ग्रंथपालाचे आपल्या समव्यावसायिकांशी संबंध (Relation of the Librarian to his profession),
(५) ग्रंथपालाचे समाजाशी संबंध.

याशिवाय इंग्लंडमध्ये १९८३ साली ग्रंथालय संघाने ग्रंथपालन व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे आचारसंहितेच्या स्वरूपात प्रसारित केलीत. तसेच अमेरिकन सोसायटी फॉर इन्फर्मेशन प्रोफेशनल्सने १९९०मध्ये माहिती शास्त्रज्ञांकरिता अशाच प्रकारची आचारसंहिता तयार केली, ज्यामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आला होता.

(१) ग्रंथपालाची प्रत्येक वाचकाप्रती जबाबदारी (Responsibility to individual person),



(२) ग्रंथपालाची समाजाप्रती जबाबदारी (Responsibility to the Society),
(३) ग्रंथपालाची आपल्या व्यवसायाप्रती जबाबदारी (Responsibility to the Profession).

या सर्व बाबी आजच्या दिवसांत अभावानेच सर्व ग्रंथपालांनी अंगीकारल्याचे दिसून येते. काही ग्रंथपाल ग्रंथपालनाचे काम हे फावल्या वेळाचे काम समजतात. वाचकाला केंद्रबिंदू मानून ग्रंथालयाचे कार्य व सेवा दिल्या गेल्यास खऱ्या अर्थाने आचारसंहितेचे पालन झाल्याचे मानायला हरकत नाही. त्याकरिता ग्रंथपालाने स्वत:हून आचारसंहितेचे पालन करायला हवे.

जपानमध्ये लायब्ररी असोसिएशनने १९८० साली ग्रंथपालांकरिता आचारसंहिता तयार केली; तर भारतात १९८४ साली जॉइंट कौन्सिल ऑफ लायब्ररी असोसिएशन्स इन इंडिया (JOCLAI) ने सर्वप्रथम ग्रंथपालनाची आचारसंहिता तयार केली. त्यातील बाबींचा खालीलप्रमाणे थोडक्यात आढावा घेण्यात येत आहे.

(१) ग्रंथपालन हा सेवाभावी व्यवसाय आहे. ग्रंथपालाने माहितीचे संकलन करून अशी माहिती सहज प्राप्त करता येईल अशा रितीने त्याची मांडणी करावी व ज्यांना अशी माहिती हवी आहे त्यांना ती मिळेल असे व्यवस्थापन करावे.
(२) प्रत्येक वाचकाला हवी असलेली माहिती, माहितीची साधने प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी व त्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. त्यांची वाचनाची आवड वाढावी याकरिता ग्रंथपालाने सर्व लोकतांत्रिक पद्धतींचा अवलंब करून वाचकांना सेवा पुरवाव्यात.
(३) वाचकाने मागितलेल्या किंवा संभाव्य मागणी असलेल्या सर्व माहितीच्या साधनांची माहिती ग्रंथपालाने अवगत करावी व त्यांना ती उपलब्ध करून द्यावी. यात ग्रंथ, नियतकालिके तसेच सर्व प्रकारच्या माहितीच्या साधनांचा समावेश करावा. आपल्या वाचकांना हवी असलेली माहिती पुरविण्यासाठी व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न करावा व संभाव्य वाचकापर्यंत ती माहिती पोहोचवावी.
(४) ग्रंथालय व माहितीक्षेत्रातील सर्व व्यावसायिकांनी आपल्या कामात सेवाभावी वृत्ती जोपासावी. हे करीत असताना प्रत्येकाने स्वत:चे व्यक्तिगत तत्त्वज्ञान, कल हे आपल्या आचरणात आणू नये व त्याचा विपरीत प्रभाव आपण ज्या संस्थेत काम करतो त्यावर होणार नाही याची काळजी घ्यावी.
(५) या क्षेत्रातील व्यावसायिकांनी बेकायदेशीर, अनैतिक, सदोष कोणतेही गैरकृत्य आपल्या आचरणात आणू नये व सर्व वाचकांना समान वागणूक व सेवा पुरवाव्यात.
(६) ग्रंथालय व माहितीक्षेत्रातील व्यावसायिकांनी सर्वांना तात्काळ सेवा देण्यावर भर द्यावा. प्राधान्य द्यावे. कारण उशिरा सेवा दिल्यास किंवा वाचकांना लगेच प्रतिसाद

न दिल्यास वाचकांची नाराजी तर होतेच व ग्रंथालयाविषयी त्यांचे मतही खराब होते.

(७) सर्व व्यावसायिकांनी आपल्या व्यावसायिक संघटनाच्या विकासाकरिता सक्रिय सहभाग घ्यावा. त्यांच्या कार्यातून, आचरणातून आदर्श घालून द्यावा.

(८) या क्षेत्रातील व्यावसायिकांनी ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या क्षेत्रात शिक्षण, संशोधन कार्य करून आपल्या व्यवसायाला समृद्ध करावे व या माहितीचे साहित्याच्या माध्यमाने प्रसारण करावे.

आचारसंहितेतील काही ठळक बाबी अशा प्रकारे या ठिकाणी नमूद केल्या आहेत.

## निष्कर्ष

ग्रंथपालन व्यवसायातील व्यक्तींनी आपल्या क्षेत्राचे विशेष ज्ञान, कौशल्य, नैपुण्य, संपादन करावे व कृतीतून चातुर्य दाखवावे. ज्या व्यावसायिकाने असे कौशल्य संपादन केले असेल त्यालाच खऱ्या अर्थाने ग्रंथपालनचे व्यावसायिक समजावे. समाजाच्या या व्यवसायाकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. परंतु अनुभवातून असे पाहायला मिळते, की आपण ग्रंथालय व्यावसायिक आपल्या कार्याबद्दल बोलतो खूप; पण प्रत्यक्षात तसे अनुभवास येत नाही. आजही भारतात राष्ट्रीय स्तरावरील ग्रंथालय संघाची सभासद संख्या काही हजारोंत आहे. जवळपास ८०% व्यावसायिक साधे राष्ट्रीय ग्रंथालय संघाचे सभासदही नाहीत. मग आचारसंहितेची माहिती व तिचे आचरण तर दूरच. ग्रंथपालनाची काही आचारसंहिता असते, काही नैतिक जबाबदाऱ्या असतात, या कल्पनेपासून आजही बरेच ग्रंथपाल बरेच लांब आहेत.

ग्रंथपालनाची नैतिक तत्त्वे, मानदंड, प्रमाणके, आचारसंहितेच्या रूपाने निश्चितच चांगले आहेत. त्याचे आचरण या व्यवसायाची खूप प्रगती करेल यात मात्र शंका नाही.

Work is worship
Be professional in your work.
ग्रंथपालनास नोकरी समजणे होईल अधर्म ।।
कारण
सेवा परायणता हाच आहे आमुचा धर्म ।।
त्याग आणि समर्पण हेच या व्यवसायाचे मर्म ।।

## References

(1) Bahe Khushal , Inaugural address at xx National of IASLIC, Punjab University, Patiala, Dec.27-30, 2002.
(2) Potdar S.P., Role of Academic Libraries in Quality Education, A Keynote Address, Changing role of academic libraries in higher education conference organised by Nagpur University College Library Association at Wardha on 12th January, 2003 .
(3) Ibid
(4) Fosket D. J., The creed of a librarian, No. Politics, No Religion, No Morals. In Occasional papers from North, Western group of the library Association (Ref. Special & Information Section) N3, 1962.
(5) Rao C. Y. , Towards professional ethics - paper presented at 22th National Seminar of IASLIC, Hydrabad, 1984.
(6) Bekker J, Professional Ethics and its application to librarianship. Case, Western Reserve Univercity,Cleveland, 1976.
(7) Radhakrishnan S. , University Education Commission Report, 1948-49.
(8) Seetharama S. , In search of code of professional ethics - Paper presented at XIth National Seminar of IASLIC, Hydrabad, 1984.
(9) Chaterjee, Amitabh, Psycology and deontology profession - Paper presented at XIth National Seminar of IASLIC, Hydrabad, 1984.
(10) Chaterjee, Amitabh : Librarianship as a profession : a literature survey.
(a dissertation for M. Lib. Sc. degree of Delhi University, 1964, P4-5.
(11) Headicar B. M., "A manual of library organisation", London, Allen & Unvin, 1911, P4 - 5.
(12) Headicar B. M., A manual of library organisation.
(13) Ganguly S. M., An ethical code for the library profession in India, Paper presented at XIth National Seminar of IASLIC, Hydrabad, 1984.
(14) Ibid.
(15) Seetharama S., In search of a code of professional ethics - Paper presented at XIth National Seminar of IASLIC, Hydrabad, 1984.

❑ ❑ ❑

# ज्ञानव्यवस्थापन संस्कृती

प्रा.जी.ए. बुवा

*ज्ञानव्यवस्थापन संस्कृती (Knowledge Management Culture) हा एक कोणत्याही संस्थेचा महत्त्वाचा असा घटक आहे. या घटकामुळे कोणत्याही संस्थेस दीर्घ काळ सक्षमपणे काम करणे साध्य होते. तसेच दीर्घकालीन स्पर्धात्मक संस्था विकासाकरिता हा एक अत्यावश्यक घटक आहे.*

ज्ञानव्यवस्थापनाकरिता आजकाल अनेक बाबींचा गरज असली तरीदेखील संस्थेच्या बदलत्या व्यवस्थापनास सहाय्य करण्यासाठी ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीसारखा दुसरा महत्त्वपूर्ण घटक नाही. सर्वसाधारणत: या घटकाची व्याखा पुढीलप्रमाणे केली जाते.

''अशी एक साहाय्यभूत क्रिया की, जिच्याद्वारे ज्ञान संपादन करणे, उपार्जित करणे, निर्माण करणे व संग्रहित करणे. या घटकावर आधारित संस्थेचा सक्षम विकास साधता येतो.''

"The process by which an organisation creates, captures, acquires and uses knowledge to support and improve the performance of the organisation" - Kenney

Kenney यांनी ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीसंदर्भात केलेली व्याख्या, प्रस्तुत संकल्पनेस सुस्पष्टता प्राप्त होण्यास उपयुक्त आहे. ज्ञानव्यवस्थापन संकल्पनेचा अधिक विस्ताराने विचार करता ''ज्ञाननिर्मिती उपक्रम व ज्ञानवितरण उपक्रम'' या बाबतीतदेखील सदर संज्ञा उपयुक्त ठरणारी आहे. या संदर्भात २१व्या शतकाच्या प्रारंभकाळात Alavi and Leinder (2001) Nonaka Toyama and Konno यांनी मांडलेल्या संकल्पनादेखील ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीची उपयुक्तता स्पष्ट करणाऱ्या आहेत. या व्यवस्थापनशाखेचा विस्तार व विचार आजकाल अधिक गांभीर्याने करण्यात येण्याचे कारण म्हणजे संस्थेच्या दीर्घकालीन प्रभावाकरिता त्याची असलेली उपयुक्तता हेच होय. ज्ञानाची व्यक्त व अव्यक्त व उपयोजित रूपे सर्वश्रुत आहेत. अशा ज्ञानरूपाचा



उपक्रमाच्या माध्यमातून मापन करण्यासाठी ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीचे संवर्धन होणे गरजेचे आहे.

## ज्ञानव्यवस्थापन उपक्रमाकरिता आवश्यक घटक

ज्ञानव्यवस्थापन उपक्रमांचा अवलंब करण्यासाठी अनेक शोध मॉडेल्स अस्तित्वात आहेत. या संदर्भात Grover and Verentprot (2001) and Gld-Molhotras (2001), Karvleser & Gottschalk (2004) अशा तज्ज्ञांनी याकरिता महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. विशिष्टपणे ज्ञानव्यवस्थापनाबाबत चर्चा करताना याबाबतचे अधिक उपयुक्त घटक अलीकडील संशोधनाद्वारे ॲलेझमी व झैरी यांनी नमूद केले आहेत. ज्ञानव्यवस्थापन उपक्रमाचा प्रभावी व परिणामकारक वापर करण्यासाठी संस्कृती, प्रशिक्षण, ज्ञान आदान-प्रदान, उच्चस्तरीय व्यवस्थापनाचे सहकार्य, तांत्रिक उपक्रमांची उपलब्धता हे घटक महत्त्वाचे असल्याचे ॲलेझमी व झैरी यांनी नमूद केले आहे.

## ज्ञानव्यवस्थापन संस्कृती

कोणत्याही ज्ञानव्यवस्थापनात संशोधनात्मक, आकृतिबंधात्मक मॉडेलसची मुक्त संस्थात्मक संस्कृतीची नितांत गरज असते. कोणत्याही संस्थेचे असे आकृतिबंध हे त्या त्या संस्थेच्या व्यवस्थापनाचे वैशिष्ट्य असते. आधुनिक कालखंडात ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीमध्ये तंत्रज्ञान हा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. स्थूल मानाने विचार करता यामध्ये (१) माहिती, (२) तंत्रज्ञान, (३) वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि परंपरा अशा तीन घटकांचा ज्ञानव्यवस्थापनामध्ये समावेश होतो. पण या तीनही घटकांपैकी संस्कृती वा परंपरा हा घटक अधिक महत्त्वाचा असतो. सर्वच ज्ञानव्यवस्थापनप्रक्रियेत उच्चस्तरीय तंत्रज्ञानाची गरज असतेच असे नाही. उलटपक्षी तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर करण्यासाठी तंत्रज्ञान हे नेहमीच संस्थेस संस्कृती व ज्ञानव्यवस्थापन याच्या सहसंबंधाकरिता अधिक महत्त्वाचे असते.

स्वीन (Schein) ने १९९० मध्ये संस्कृतीची व्याख्या घटकावर आधारित केलेली आहे.

(अ) गृहीतकांचा मूलभूत आकृतिबंध (A pattern of basis assumptions),

(ब) एखाद्या निर्धारित गटाकडून शोधीत / शोधलेले अथवा विकसित केलेले (Invented, discovered or developed by given group),

(क) बाह्य बदल आणि अंतर्गत एकजिनसीकरण अशा समस्या सारख्या अनुभवातून प्राप्त झालेले (As if learns to cope with its problems of external adoptions and internal integration),

(ड) अशा समस्यांपूर्तीसाठी उपयुक्त ठरलेले आणि त्यामुळे पात्र ठरलेले (That has worked well enough to be considered valid and therefore)

(इ) यामुळे नवागताना शिकविण्यासाठी, आणि (is to be taught to new members as the),

(फ) विचार करण्यास आकलन होऊन प्रवृत्त करेल आणि समस्याशी संबंधित असेल असा योग्य आकृतिबंध आहे. (Correct way to perceive, think, and feel in relation to those problems).

तसेच विलकिन्स आणि डायर (Wilkins and Dyer) यांनी संस्कृती अथवा परंपरा यांबद्दल मत व्यक्त करताना संस्कृती ही प्रभावी असलेल्या व्यक्तिसमूहाने संस्थेच्या विकासाकरिता अवलंबविलेली पद्धती; मूल्ये, क्षमता आणि विश्वास यांवर आधारित असते. ("....is (composed) of the values, competencies and beliefs of a group of people that strongly influence whether and how organizational strategies are implemented.")

याचबरोबर विविध तज्ज्ञांनी संस्कृती (culture) च्या विविध व्याख्या केलेल्या असून स्वीने (Schein) यांनी १९८५ मध्ये केलेली एकत्रित व्याख्या विशेष लक्षणीय आहे.

'Culture : A pattern of basic assumptions invented, descovered or developed by a given groups as it learns to cope with its problems of external adoption and internal integration that has worked well enough to be considered valid and, therefore, to be taught to new members as the correct way to perceive, think and feel in relation to those problems.'

एखाद्या एकरूप गटाकडून मूलभूत गृहीतकाचा पॅटर्न जो शोधाद्वारे, संशोधनाद्वारे आलेल्या अनुभवावर किंवा विकसित केलेल्या समस्येच्या स्पष्टतेबद्दल व अंतर्गत रचना जी अंतिमत: पात्र वा उपयुक्त ठरावी व जिच्या आधारे नवागतांना ती शिकवून त्यांच्याकडून विचाराद्वारे, समस्येची पूर्तता करता यावी असे या व्याख्याचे स्वरूप असून ती अधिक सुस्पष्ट आहे. संस्कृतीद्वारे संस्थेच्या उत्पादन वा सेवानिर्मितीच्या योगदानाचेच हे द्योतक आहे. कोहेन या संदर्भात पुढे म्हणतो, कोणत्याही संस्थेची संस्कृती ही अनुभव व त्या संस्थेशी निगडित पूर्वसुरींच्या कार्यानुभव व त्यांच्या प्रभावातूनच निर्माण झालेली असते व त्याच आधारावर ती विकसित होत असते. तसेच ती विशिष्ट गटाकडून अभ्यासलेल्या उत्पादन व सेवांचे स्वरूप आणि त्या निर्माण करताना प्राप्त झालेल्या अनुभवातून सिद्ध होत असते.

ज्ञानव्यवस्थापन उपक्रमांची सातत्यपूर्वक प्रगती ही संस्कृतीच्या सहकार्याशिवाय



साध्य होत नाही. कारण संस्कृती, ज्ञानव्यवस्थापन उपक्रमास प्रोत्साहन देते. अप्रगट व प्रगट ज्ञानाद्वारे संस्थेतील कर्मचारीवर्ग एकमेकांशी सहसंप्रेषण व सहकार्य करून संक्रमण काळात प्रगट ज्ञानाचे रूपांतर उपयुक्त ज्ञानामध्ये करण्यास प्रवृत्त होतात. याद्वारे हे स्पष्ट होते की, व्यक्ती आणि संस्थात्मक ज्ञान यामध्ये साहचार्य प्रस्थापित करण्यास संस्कृती हा घटक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावीत असतो.

## लेव्हीटचे ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीवर परिणाम करणारे मॉडेल (Leavit's Model of change)

लेव्हीटने संस्थात्मक बदल व त्याची अंतिम परिणती व ज्ञानव्यवस्थापन संस्कृती यांचा सहसंबंध स्पष्ट करताना आपल्या मॉडेलद्वारे या प्रक्रियेत ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीचे असाधारण महत्त्व सुस्पष्ट केलेले आहे. या मॉडेलद्वारे व्यवस्थापनास, संशोधकास आपल्या वैचारिक प्रक्रियेस चालना देण्यास प्रोत्साहन प्राप्त होते. संस्थेशी संबंधित घटक, त्याअंतर्गत सहसंबंध यांची सुसंगत मांडणी व त्यातील अंतरप्रक्रिया हे संस्थेचे ज्ञानव्यवस्थापन करण्यास कसे पूरक आहेत हे लेव्हीट यांनी आपल्या पुढील मॉडेल मधून मांडलेले आहे.




Knowledge Management Culture ज्ञानव्यवस्थापन

लिव्हीट यांच्या म्हणण्यानुसार संख्यात्मक यशस्वी बदलासाठी उत्पादन व सेवा, व्यक्तिसमूह, तंत्रज्ञान याची रचना ही नियोजित स्वरूपात असणे अत्यंत आवश्यक आहे.

## लेव्हीट यांच्या मॉडेलमधील घटक

### (१) उत्पादन अथवा सेवा (Task)

वस्तूची निर्मिती अथवा सेवा व त्या संबंधित इतर पूरक वस्तू वा उपसेवा हा एखाद्या संस्थेने हाती घेतलेला उपक्रम हा उत्पादन स्वरूपात विचारात घेणे गरजेचे आहे असे लेव्हीट यांनी नमूद केले असून 'हॅकमन व लॉगट' हे उत्पादने ही बाब 'कृती वा काम' या अर्थाने ध्वनीत करतात. या अंतर्गत विविधता, स्वायत्तता, विशिष्टता व प्रतिसाद या मूलभूत घटकांचा समावेश असून याच बाबी सेवा समाधानासंदर्भात आवश्यक असल्याचे नमूद करतात.

### (२) आकृतिबंध (Structure)

लेव्हीट यांच्या मतानुसार आकृतिबंध म्हणजे एक संप्रेषण पद्धती. या अंतर्गत अधिक काम सातत्य हा घटक विचारात घेणे होय. या क्षेत्रातील मिन्टझबर्ग, थॉमसन, गॅलब्रेथ अशा तज्ञांनी आकृतिबंधाच्याबाबत संस्थेच्या उद्दिष्टांचा विचार केलेला आहे. यामध्ये सर्व छोट्या-मोठ्या बाबींचा अंतर्भाव केलेला आहे. तर अलिवूडने या संशोधनातून तीच बाब संस्थेने आपली उद्दिष्टे पुरी करण्यासाठी कामगारांकरिता बहाल केलेली / उपलब्ध केलेली व संस्थेद्वारे नियंत्रित केलेली पद्धती या दृष्टिकोनातून विचारात घेतलेली आहे.

### (३) व्यक्तिसमूह (People)

लेव्हीट यांच्या मतानुसार जे व्यक्तिसमूह म्हणजे प्रत्यक्ष कृती करतात वा जे संस्थेचे काम करतात असे लोक अथवा मनुष्य अशा प्रकारे याची व्याख्या केलेली आहे तर लोवॅच व सिग्मंड यांनी व्यक्तिसमूहाचे दोन प्रकारांत विभाजन केलेले असून ते प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष यशस्वी गटात करतात. याबाबत इतर अनेक तज्ज्ञ व्यक्तींनी मते व्यक्त केलेली असली तरीदेखील लेव्हीटच्या मूलभूत संकल्पनेस त्यामुळे बाधा येत नसून त्यातून अंतिमत: प्रेरणा, प्रोत्साहन व दिशा हीच ध्वनीत होते, जी मनुष्यबळाच्या कृतीस चालना देते.

### (४) तंत्रज्ञान (Technology)

प्रत्यक्ष कृतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करून निर्माण केलेली साधने व त्यांवर आधारित करावयाची कृती. उदाहरणार्थ, संगणक.

लेव्हीटच्या मॉडेलनुसार तंत्रज्ञान ही पद्धती, प्रक्रिया व निर्मितीची अथवा उत्पादनाची साधने यांद्वारे ज्ञान संप्रेषणात महत्त्वाची भूमिका बजावते.

तसेच ॲलवी व लेन्डर यांनी नमूद केलेल्या बाबी म्हणजे माहिती-तंत्रज्ञानाचे संख्यात्मक



ज्ञान, व्यवस्थापनातील कोडिंग, उत्तम /दर्जेदार पद्धतीने समावेशन व सहकारी तत्त्वावर ज्ञानसंप्रेषणास दिशा निर्देशित करणे व त्याद्वारे ''ज्ञानजाळे'' (Knowledge Network) तयार करणे होय. उदाहरणार्थ, ई-मेल, सहकारी तत्त्वावरील अंतर्गत जाळे (Internate), डाटा बेसिस, प्रलेख व्यवस्थापन, इलेक्ट्रॉनिक्स बुलेटिन बोर्ड्स व चर्चा गट.

ज्ञानव्यवस्थापन संस्कृतीमध्ये इतर घटकदेखील विचारात घेणे गरजेचे आहे. ज्यामध्ये बदलणारे घटक हे अधिक महत्त्वपूर्ण आहेत. लेव्हीट यांच्या मतानुसार बदलासाठी हे चार घटक जरी कारणीभूत असले तरीदेखील इतर घटकही बदल प्रक्रियेकरिता महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

## ग्रंथालयीन व्यवस्थापन संस्कृती

ग्रंथालये ही सेवाभावी संस्था म्हणून कार्यरत असल्याने सहाजिकच ग्रंथलयांसाठी 'ज्ञानव्यवस्थापन संस्कृती' या संकल्पनेचा आपोआपच संबंध प्रस्थापित होतो. सेवा हे एक उत्पादनच असते आणि ही सेवा दर्जेदारपणे निर्माण करण्यासाठी मनुष्यबळ, तंत्रज्ञान या बाबी ग्रंथालयाशी संबंधित आहेत व त्याच ग्रंथालयाच्या सेवानिर्मिती व वितरणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात. संस्कृती ही संस्थेच्या पूर्वानुभवातून सिद्ध होत असल्याने ती ग्रंथालयांशी निगडित आहे आणि ग्रंथालयाच्या विकासास ती कारणीभूत असते. त्यामुळे संस्कृती ही विद्यमान व भविष्यातील ग्रंथालयातील प्रमुखांना व त्या क्षेत्रातील व्यक्तींना मार्गदर्शन करेल / एक बौद्धिक स्रोत व्यक्तिगत वा ग्रंथालय (संस्था) यांच्या दर्जेदार विकासाकरिता उपलब्ध करून देईल.

ग्रंथालये आणि इतर सांस्कृतिक संस्था शतकानुशतके त्यांच्या पूर्वपरंपरा, त्या संस्थांतील व्यक्ती व व्यक्तिगत अनुभव यांवर आधारित नवागताकरिता एक सांस्कृतिक वारसा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे निर्माण करतात. यांमध्ये ग्रंथालयांची वाटचाल, कामकाज पद्धती व ग्रंथालयांचा एक विशिष्ट ढाचा यांचा समावेश होतो. याचबरोबर अशा घटकांबरोबर ग्रंथालयाबद्दलची श्रद्धा, भाषा पद्धती व प्रकार, वाटचाली संदर्भातील ऐतिहासिक घटना व तत्सम पूर्ण यश वा अपयश यातून प्राप्त झालेले अनुभव यांचाही अंतर्भाव होतो. ग्रंथालये एकूणच मागणी संस्कृती संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. सध्याच्या परिस्थितीत ही भूमिका तर ग्रंथालयाच्या दृष्टीने अधिकच आव्हानात्मक आहे. कारण आजकाल ग्रंथालयातील सामाजिक आस्था एका बाजूने कमी होत आहे; तर दुसरीकडे खाजगी संस्था व शासन यांच्याकडूनही ग्रंथालयांकरिता उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये लक्षणीय कपात होताना दिसते. त्यामुळे कदाचित ग्रंथालयांचा लाभही होऊ शकेल. कारण ग्रंथलयांची मूलभूत प्रबळ साधने कोणती व कमतरता वा त्रुटी यांचा शोध घेऊन ग्रंथालयांचा नवा असा प्रभावी व स्वत:च्या

आर्थिक स्रोताच्या मार्ग शोधून ग्रंथालयाचे महत्त्व व उपयुक्तता सिद्ध करणे सुलभ होईल. अर्थात हे ग्रंथालयासारख्या सेवाभावी संस्थांसमोरील फार मोठे आव्हान आहे. पण स्वत:ची सांस्कृतिक मूल्ये सांभाळत आणि व्यक्तिमत्त्व जपत एक शक्ती व बलस्रोत म्हणून ग्रंथालये उभी राहाण्यासाठी नवी पायवाट उपयुक्त ठरेलच असा या क्षेत्रातील तज्ज्ञांना विश्वास वाटतो.

स्वीन (Schein) याच्या मतानुसार संस्कृती ही तीन स्तरांवर कार्यरत असते. यामध्ये (१) वस्तुस्थिती व निर्मिती, (२) मूल्य व (३) मूलभूत गृहीतके यांचा समावेश होतो. पहिला स्तर हा दृश्य स्वरूपातील असून वैयक्तिक व सामाजिक वातावरण, भाषा व समाज यांच्याशी संबंधित आहे. पहिल्या स्तरातील भाषा घटकातील ग्रंथालयाची भाषा ही कालसापेक्ष बदलत असते. येथे भाषा ही कृतीशी संबंधित आहे. अलीकडील ऑनलाईन शोध, डिजिटल संदर्भस्रोत, इंटरनेट डेटाबेस ही याची उदाहरणे होत. तसेच कपाटातील ग्रंथांची जागा व तालिकीकरणाची पत्रे यांच्या जागी संगणक नेटवर्क, मल्टिमीडिया या स्रोतांचा वापर केला जात आहे. एकूणच तंत्रज्ञानाने याबाबतीत अमूलाग्र बदल केलेला आहे. द्वितीय स्तरामध्ये मूल्य ही बाब विचारात घेताना ग्रंथालय प्रमुखाने (संस्थाप्रमुखाने) एक विशिष्ट भूमिका घेऊन मूल्यात्मक धोरणाचा प्रभाव निर्माण केल्यास त्याच्या संप्रेषणातून या मूल्यांचे महत्त्व व यशस्वीता सिद्ध झाल्यास सांस्कृतिक वाटचालीची एक संप्रेषण पद्धती सिद्ध होते. त्याचा पुढे प्रसार व वापर केला जातो. ग्रंथलयासंदर्भात 'युजर फ्रेंडली' गतिमान सेवा (वेळ वाचावा) व लवचीकता या तत्त्वांचा विचार केला जातो हे अशा यशाचेच द्योतक आहे.

तिसऱ्या स्तरातील मूलभूत गृहीतकांमध्ये वापरली जात असेलेली तत्त्वे वा पद्धती याकरिता चिकित्सक दृष्टिकोन वा सूक्ष्म निरीक्षण यांचा अवलंब करणे गरजेचे असते. कारण ग्रंथालये ही मूल्ये, प्रभाव अथवा सक्षमता आणि भव्य असा सांस्कृतिक वारसा कार्यरत करतात. तसेच संस्था वा समाजातील उपघटक यांचाही प्रभाव ग्रंथालय संस्थेवर होत असतो, हेही विसरता येणारे नाही. एकूणच ग्रंथालय संस्कृती संदर्भात स्वीन यांनी केलेले विवेचन हे अत्यंत चिकित्सक असून त्यामध्ये सूचविलेली गृहीतके ही विस्तारित व महागडी असून ती वेळखाऊ आहेत. यामुळे लहान ग्रंथालयांबरोबरच मोठ्या ग्रंथालयांना त्याचा अवलंब करणे शक्य नाही. या संदर्भात 'व्यवहार्य' अशी विचारधारा Quinn & Rohr Baugh, Kimberly & Cameron यांच्या तत्त्वाशी जोडलेली आहे.

संस्कृतीचे प्रकार विचारात घेताना (१) प्रभावी सांस्कृतिक वैशिष्ट्य, (२) नेतृत्व शैली, (३) मनुष्यबळ व्यवस्थापन, (४) संस्थेची चिकाटी,(५) व्यावहारिक व धोरणात्मक जोर, (६) यशस्वीतेकरिता विचारात घेतलेले निकष या उपघटकांचा विचार करूनच ग्रंथालय संस्कृतीचे प्रकार निर्धारित करणे वा ठरविणे शक्य होते. या बाबी



विचारात घेऊन पुढील प्रकारच्या ग्रंथालयांसाठी संस्कृतीचा विचार करणे शक्य झाले आहे.

## (अ) शैक्षणिक ग्रंथालये

शैक्षणिक संस्थांचा अविभाज्य घटक म्हणजे ग्रंथालये होय. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ नजरेसमोर येताच ग्रंथालयांचा विचार अपरिहार्य ठरतो. शैक्षणिक ग्रंथालयांचे शिक्षणप्रक्रियेतील योगदान विचारात घेता त्यांचे स्वरूप पूर्णत: भिन्न असते. ही ग्रंथालये सर्वसामान्यत: औपचारिक स्वरूपाची असतात. यापूर्वी शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये दोन स्तरीय नेतृत्वव्यवस्था होती. एक विभागीय व्यवस्थापन व दुसरा ग्रंथालय प्रशासक. यातील विभागीय व्यवस्थापक हे अनुभवी ग्रंथपाल असत व ते ग्रंथालयाच्या यशस्वीतेकरिता जबाबदार असत. विद्यार्थी व विशेषत्वाने शिक्षकवर्ग यांच्या वाचनसाहित्यविषयक गरजांची पूर्तता यावरच त्यांचे यशापयश अवलंबून असल्याने समाज आणि व्यक्तिगत सेवांना अशा ग्रंथालयात सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नसत. ग्रंथालयातील संदर्भ सेवा यांचे स्वरूपही केवळ विद्यार्थी आणि कर्मचारी (शिक्षक) यांच्यापुरतेच मर्यादित राहिले. भविष्यात हळूहळू यामध्ये बदल होत गेला. बदलत्या शैक्षणिक वातावरणामुळे या सेवा काही प्रमाणात समाजाभिमुख झाल्या. तसेच अशी ग्रंथालये केवळ स्वत:च्या वाचनसाहित्याचा आधारच सेवापूर्ततेसाठी घेत असत. बदलणाऱ्या वातावरणामुळे व वाचनसाहित्य विकास व विस्तारामुळे या ग्रंथालयांना मातृसंस्थांचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरले. तसेच संबंधित संस्थांची ग्रंथालये ही हळूहळू अशा ग्रंथालय सहकारात अंतर्भूत होऊन सेवांचे स्वरूप बदलले. तसेच त्यांचा विस्तारही वाढत गेला.

तंत्रज्ञानातील आमूलाग्र बदल व त्याचा ग्रंथालयातील अंतर्भाव, आर्थिक स्रोतात झालेली वाढ आणि स्पर्धा यामुळे ग्रंथपाल, कर्मचारी वर्ग आणि प्रत्यक्ष संस्था यांना हे सारे बदल स्वीकारून सेवांचे स्वरूप व विस्तार करणे गरजेचे ठरले. वाचनसाहित्याचे बदलते स्वरूप, बाह्य स्रोतांची गरज, या वाचनसाहित्याचे संग्रहण, तांत्रिक उपस्कार हे सारे नव्या वातावरणानुसार करणे ही बाब गरजेची ठरली. यामुळे ग्रंथालयातील कर्मचारी वर्गास आपल्या कार्यपद्धती व कौशल्य यांच्यात बदल करणे अपरिहार्य ठरले. संगणकाचा वापर, इंटरनेट सुविधा, डिजिटायझेशनचा अंतर्भाव, डाटा बँक / डाटा बेस, ई-बुक्स, ई-जर्नल्स यामुळे या ग्रंथालयांच्या सेवा व स्वरूपात कालसापेक्ष बदल करणे गरजेचे ठरले. जरी हे बदल होत राहिले तरीदेखील या बाबीचा त्वरित अवलंब करणे ग्रंथालयास शक्य झालेले नाही. परिणामत: वाचकांच्या गरजा समाधानकारकरित्या पुरविण्यात आजही शक्य झालेले नाही. वाचकांबरोबर प्रशासनानेही केवळ सेवाभावी न राहता (Cost effective) तर ते किमतीच्या स्वरूपातही (फायदा स्वरूपात) (Cost benificiary)

विचारात घेणे गरजेचे आहे.

## (आ) सार्वजनिक ग्रंथालये

सार्वजनिक ग्रंथालये ही सुरुवातीस धार्मिक स्वरूपाच्या वाचनसाहित्यास प्राधान्य देणारी अशीच होती. बदलत्या समाजव्यवस्थेनुसार त्यांचे स्वरूप हे समाज प्रबोधन व समाजाचे मनोरंजन या दृष्टीने विकसित होत गेले. त्यामुळे त्यांच्या सेवांचा विस्तारही होत गेला. पाश्चात्त्य देशांत या ग्रंथालयांना समाजात अधिकाधिक महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. अनुदानाचे पुरेसे स्रोत उपलब्ध असल्यामुळे या ग्रंथालयांचा कालसापेक्ष विस्तार व विकास होत गेला. पण भारतासारख्या देशात एके काळी अत्यंत समृद्ध असलेली सार्वजनिक ग्रंथालयव्यवस्था आज निष्प्रभ ठरलेली आहे. शासनाची उदासीनता, अपुरा आर्थिक पुरवठा व वाचनसाहित्याबद्दल, वाचनाबद्दल समाजाची बदललेली आत्मीयता यामुळे सार्वजनिक ग्रंथालयाचा येथे पुरेशा प्रमाणात विकास व विस्तार झालेला नाही. या ग्रंथालयांचे व्यवस्थापन हे या बदलत्या परिस्थिती विस्कळीत झाल्याचे दिसते. यामुळे वाचनसाहित्यातील आमूलाग्र बदल, तंत्रज्ञानाच्या अंतर्भावाचा अभाव यामुळे या ग्रंथालयांच्या सेवाही अविकसित राहिल्या आहेत व सगळ्या बाबींचा अंतिम परिणाम ग्रंथालयाच्या व्यवस्थापनावरही होत गेलेला जाणवतो. संशोधन ग्रंथालये, औपचारिक ग्रंथालये यामध्ये त्यांच्या गरजांचा विचार करता कालसापेक्ष अद्ययावत होणे गरजेचे होते. तसेच अशा ग्रंथालयांना उपलब्ध असलेले आर्थिक स्रोत हे काही प्रमाणात पुरेसे असल्याने त्यांचा विकास व विस्तार कालसापेक्ष होत गेल्याने त्यांच्या सेवाही प्रभावीपणे उपलब्ध करून दिल्या गेल्या. विशेषत्वाने संशोधन ग्रंथालयांच्या मध्ये असे बदल त्वरित स्वीकारले गेले. आधुनिक सेवासाधनांच्या दृष्टिकोनातून औद्योगिक ग्रंथालये भारतासारख्या अविकसित देशात पुरेशी सक्षम झालेली नाहीत; त्यामुळे अशा ग्रंथालयांच्या संस्कृतीत कालसापेक्ष सक्षम बदल झाल्याचे आढळत नाही.

**एकूणच सर्वस्तरीय ग्रंथालयाच्या संस्कृतीचा विचार करता –**

(१) ग्रंथालय प्रशासनाने व त्यांच्या नेत्यांनी (ग्रंथपालांनी) दीर्घकालीन परंपरांचे स्थैर्य व अनुदान यांच्या आधारे आपल्या ग्रंथालय आकृतिबंधात बदल केलेला आढळतो.

(२) भविष्यातील बदलांचा विचार करणे व त्यांचा अंतर्भाव करणे याची अपरिहार्यता या क्षेत्रातील व्यक्तींना झालेली आहे.

(३) अपुऱ्या आर्थिक स्रोतांचा व उपभोक्त्यांच्या वाढत्या गरजा व अपेक्षा यांचा समतोल साधणे शक्य होत असल्याने या ग्रंथालयातील कर्मचारीवर्गाची अवलंबितता वाढलेली आहे.



(४) ग्रंथालये ही सेवाभावी संस्था असल्याने त्यांना स्वत:चे असे पुरेसे आर्थिक स्रोत निर्माण करणे शक्य होत नाही. यामुळे येथील कर्मचारीवर्गास बांधीलकी, उत्पादकता, प्रभावी सेवा व सेवांचा विस्तार या बाबींचा प्रभावीपणे अवलंब करणे अशक्य होत आहे.

(५) कर्मचारीवर्गास नव्या बदलामुळे विशेषत्वाने तंत्रज्ञानाच्या अवलंबामुळे प्रशिक्षणाची गरज निर्माण झालेली आहे. प्रशिक्षण पुरेशा प्रमाणात सर्व स्तरांना उपलब्ध न झाल्याने ग्रंथालयांच्या सेवांवरही दुष्परिणाम होत आहे.

(६) या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना आवश्यक अभ्यासक्रमांचा अंतर्भाव प्रभावी झाल्यास व पुरेसे आर्थिक स्रोत उपलब्ध झाल्यास ग्रंथालय सेवांचा विकास व विस्तार होईल. यामुळे ग्रंथालये वाचकाभिमुख बांधीलकी सक्षमपणे पुरी करू शकतील.

आजकाल इंटरनेट, डिजिटल ग्रंथालये यांचा होत असलेला विकास व त्यांचा सर्वस्तरीय अवलंब हे ग्रंथालय संस्कृतीसमोरील मोठे आव्हान आहे. ज्ञानव्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, परस्पर आदानप्रदानता, नव्या ज्ञानस्रोतांच्या व बाह्य स्रोतांच्या स्वरूपात स्वीकार. उदाहरणार्थ, कोलॅबरेटिव्ह प्लॅटफॉर्म्स रिपॉझिटरीज यांचा सापेक्ष वापर व त्यावर आधारित प्रभावी सेवा, ग्रंथालयसेवांचे माहितीसेवांत होत असलेले परिवर्तन आणि त्या प्रभावीपणे वाचकांच्या (उपभोक्त्यां)पर्यंत पोहचणे गरजेचे असल्याने प्रशिक्षणास प्राधान्यक्रम प्राप्त झालेला आहे. संगणकसाक्षरता, माहितीसाक्षरता असे या प्रशिक्षणाचे स्वरूप नव्या बदलानुसार स्वीकारणे गरजेचे आहे. नव्या आर्थिक स्रोतांचा शोध या सर्वांचा परिणाम ग्रंथालय व्यवस्थापनावर होणे क्रमप्राप्त आहे. यामुळे व्यवस्थापनातील आमूलाग्र बदल ही अपरिहार्य बाब होऊन बसलेली आहे. अशा अवलंबाकरिता नवी प्रमाणके निर्धारित करणे, निकष नियमांचा अवलंब करणे, प्रभावी सेवा देत असताना आपल्या ग्रंथालयाची सुरक्षितता जपणे व वैशिष्ट्य टिकविणे हे ग्रंथालयक्षेत्रातील आधुनिक संस्कृतीकरिता फार मोठे आव्हान आहे.

## संदर्भ

(1) Wilkins A. L. & Dyer W.H., Discards Culturally Sensitive Theories of Culture Change, The Academy of Management Review, 13(4), 1988.

(2) Michelle L. & Others, Library Trends, Summer 2004.

(3) www. midwestacademy.org/proceeding/2005/papers/hurley green %20 revision.doc.

❑❑❑

# सहयोगी उपक्रम

प्रा. जी.ए. बुवा

सहयोगी ज्ञानव्यवस्थापन आजकाल ज्ञानसंप्रेषणासाठी अत्यंत महत्त्वाची बाब म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. अशा ज्ञानव्यवस्थापनात दोन घटकांचा समावेश होतो : (१) सहयोगी ज्ञान समूह (मानवी जाळे), व (२) त्याचे प्रभावी माहिती साहचर्य (डाटा नेटवर्क). अशा प्रकारे एक हाती तंत्रज्ञानाच्या सहकार्याने भौतिक स्वरूपात अस्तित्वात अथवा उपलब्ध असलेल्या ज्ञानस्रोतांचे सहसंबंध, प्रभावीपणे ऑनलाईन तंत्रज्ञानाआधारे महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानात त्याचे रूपांतर करता आले आहे. याचबरोबर सामाजिक जाळ्याद्वारे ज्ञानाचा सामूहिक वापर केला जातो. असा आकृतिबंध, ज्ञानस्रोतांमध्ये समन्वय साधण्याकरिता उपयुक्त ठरतो. त्याचबरोबर लोकसमूहात सामाजिक जाळे तयार करण्यासाठी उपकारक ठरतो. अशा उपक्रमांना वैश्विक स्रोत (ontoversies) म्हणून संबोधिले जाते. अशा उपक्रमांद्वारे सहयोगी अभियांत्रिकी व्यवस्थापन पद्धती व ज्ञान आदानप्रदानाकरिता शास्त्रीय पद्धतीने उपाय उपलब्ध होतात.

## १. सामुदायिक ज्ञान सादरीकरणाचे नेटवर्क तंत्रज्ञान

आंतरजाळे हे ज्ञान सादरीकरणाच्या दृष्टीने विचारात घेता, यामध्ये तत्त्वपद्धती, व्यक्ती व त्यांचे सहसंबंध असलेले गट विशिष्ट ज्ञानक्षेत्रावर कार्यरत असतात. ते एकत्रितपणे विशिष्ट स्वरूपाचे ज्ञानक्षेत्र, नियमावली आणि भाषा निश्चित करून काम करतात. याद्वारे संगणकाकरिता ज्ञानक्षेत्राच्या स्वरूपाचे काळजीपूर्वक वर्णन करतात. याचाच अर्थ असा अशा उपक्रमातून संगणक माध्यमाकरिता एक चित्र व आकृतिबंध सुस्पष्ट करून ज्ञानक्षेत्राची कारणपरंपरा मांडणी करणे होय.

अशा जाळ्याद्वारे विशेषत्वाने माहितीचे गट स्रोत, विशिष्ट स्वरूप हे सुस्पष्ट केले जातात व अंतिमत: ज्ञानक्षेत्रही सुस्पष्ट होते. पूर्वपरंपरेपेक्षा अशा आंतरजाळ्याद्वारे गट स्वरूपात प्रलेखन करून ज्ञानविस्तार केला जातो. माहितीचे प्रत्यक्ष स्वरूप शोधता त्यातील सहसंबंधाचे स्वरूप दिग्दर्शन करण्यास याद्वारे मदत होऊन माहितीच्या एकसंघतेतील समस्या समजण्यासाठी ते उपकारक ठरतात. कारण ज्ञानाचा प्रत्येक घटक हा अस्तित्वात वा उपलब्ध असलेल्या ज्ञानाशी संबंधित असतो. अशा ज्ञान सादरीकरणाचा पुढील बाबींशी संबंध येतो.



### (अ) माहितीची एकसंघता

वैज्ञानिक डाटाची आजकाल वेबसाठी साठवणूक, पुनर्प्राप्ती व डाटा सहसंबंध प्रस्थापणे हे विश्वसार्ह क्षेत्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून असे ज्ञानसंग्रह व लिखाण हे मूलभूत व आवश्यक ठरू लागले आहे. आपण सुनिश्चितपणे केंद्रीभूत केलेला जीवशास्त्रीय डाटा एकसंघ स्वरूपात उपलब्ध न होणे ही एक समस्याच आहे. उदाहरणार्थ, अनियंत्रित संदर्भातील डाटा विचारात घेताना यामध्ये प्रलेख स्वरूपातील डाटा बरोबरच ऊती न्युक्लीओटाईड क्रमवारी, ॲमानो ॲसीड क्रमवारी, अणुंचा त्रिमितीय आकृतिबंध व प्रायोगिक तपशील, संदर्भातील डाटा अशा घटकांचा समावेश होतो. अशा स्थितीत आवश्यक असलेला जीवशास्त्रीय डाटा परिणामकारकपणे संग्रहित करताना समस्या निर्माण होतात. विस्फोट स्वरूप निर्मिती जीवशास्त्रीय डाटाचे वर्गीकरण, संपर्कक्षमता आणि प्रत्यक्ष उपलब्धता यांची गरज भासू लागली आहे. याच बरोबर आजकाल प्रचंड प्रमाणात निर्माण होणारा जीवशास्त्रीय डाटा याची दखल घेऊन शास्त्रीय पद्धतीने संकलित करणे व त्याची संपर्क क्षमता अनेक शाखीय स्वरूपात वाढविणे / वृद्धिंगत करणे हे आजच्या ज्ञानव्यवस्थापनासमोर मोठे आव्हान आहे. जनुकीय तंत्रज्ञान व त्याचा सखोल अभ्यास अशा सूक्ष्मतर घटकातून नवनवी अभ्यासक्षेत्रे विकसित होत आहेत. यामुळे ज्ञान गतिमान झालेले आहे. अत्यंत छोट्या अभ्यासक्षेत्राबद्दल अद्ययावतता ठेवणे प्रत्यक्ष शास्त्रज्ञांनाही अशक्य ठरत आहे. या सगळ्याचीच परिणती नेटवर्क तंत्रज्ञानाद्वारे ज्ञान गतिमान स्वरूपात उपलब्ध करून देण्याची अधिकाधिक गरज निर्माण होत आहे. यामुळे जैविक तंत्रजाळे अशा सूक्ष्म विषयाशी संबंधित नेटवर्क संप्रेषणव्यवस्था गरजेची ठरू लागलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर ज्ञानाचा सामूहिक वापर ही संकल्पना बळ धरू लागली असून याद्वारे नव्या ज्ञानक्षेत्रातील ज्ञान व त्या संदर्भातील डाटा संकलित करणे व उपलब्ध करणे व्यवस्थापकीय दृष्टीने शक्य होईल असा विचार दृढ होत आहे.

### (आ) नेटवर्क तंत्रज्ञानाद्वारे ज्ञानवाटप

वैज्ञानिक विषय क्षेत्राबाहेरही आजकाल नेटवर्कद्वारे चित्रे, प्रकाशने, बुकमार्क यांचे संग्रहण हे वेबच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात केले जात असल्याचे जाणवते. डाटाचा अवलंब करून संपर्कव्यवस्था उपलब्ध केली जात आहे. आकृतिबंधविरहीत स्वरूपातील संपर्कक्षमता ही पारंपरिक तांत्रिक उपस्काराहून कमी असल्याचे जाणवते. या बदलत्या वातावरणात उपभोक्त्यांनी सर्वदूर मजकुराची सूचीही वेब वापराकरिता प्राथमिक स्तरावर निवडलेली आहे. यामुळे डाटा वापराकरिता जागृती निर्माण झालेली

आहे. याची अंतिम परिणती म्हणजे शब्दवेधाच्या माध्यमातून अधिक सक्षम नेटवर्क तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची जागरुकता सामाजिक स्तरावर होणे हीच होय. आजची गरजच अशी आहे की, सामुदायिक स्वरूपातील ज्ञानसंग्रहण व त्याच्या वापराकरिता उपभोक्त्यांना योग्य साहाय्य वा सहकार्य पुरविणे हे केवळ सामुदायिक नेटवर्कद्वारेच शक्य आहे. सामुदायिक ज्ञान सादरीकरण हे सहसंबंध नेटवर्क तंत्राद्वारे शक्य असून याचे महत्त्व हे केवळ संग्रहण व प्राप्तीपुरते मर्यादित नसून ते शास्त्रीय पद्धतीने चर्चासत्राचा अवलंब करण्यासाठी उपकारक ठरणारे आहे.

## २. शास्त्रीय संप्रेषण व नेटवर्क तंत्रव्यवस्थापन

Wiki नेटवर्क द्वारे बाह्यस्रोत वापराचा अवलंब म्हणजे आकृतिबंधात्मक डाटा व अनौपचारिक चर्चा आणि टीकात्मक भाषांचे विखुरलेल्या डाटा स्वरूपातील निर्धारित आकृतिबंधात्मक संपादीत प्लॅटफॉर्म/ व्यासपीठ (platform) होय. हे व्यासपीठ इच्छुक उपभोक्त्यांना खुले असेल. अशा वापराद्वारे ते नेटवर्क तंत्राचा वापर करून विद्यमान नेटवर्क तंत्रज्ञानांतर्गत उपक्रमात सहभागी होतील आणि ते नवे उपक्रम हाती घेतील. नेटवर्क तंत्राची विविध रूपे ही संपादन अद्ययावतता व पुनर्वापराकरिता साहाय्यभूत ठरतील. Wiki हे एक बहुविध नेटवर्क तंत्राचे व्यासपीठ ठरून अधिक सुलभ संपर्कव्यवस्था उपलब्ध होण्यास मार्गदर्शक ठरेल.

### २.१ उपभोक्ते व सामुदायिकत्व

सामुदायिकत्व वापर जाळे उपभोक्त्यास कसे साहाय्यभूत ठरेल हे नेटवर्क तंत्रज्ञान अभियांत्रिकीद्वारे अलीकडे विचारात घेण्यात येऊ लागले आहे. बाह्यस्रोतांमधील नावीन्य म्हणजे एकसंघ समुदायाने सहकार्य व त्याचा वेब तंत्रज्ञानावर आधारित समन्वय हे होय. क्षमताधारक उपभोक्ते हे त्यांच्या आवडीची विविध क्षेत्रे निवडू शकतील. एका बाजूने क्षमता, ज्ञान व तंत्र यांची समुदायातील तज्ज्ञाकडून गरज असते. दुसऱ्या बाजूने नेटवर्क तंत्रज्ञान, त्याची भाषा ही अभियंत्याद्वारे अधिकतम प्रमाणात वापरली जाणे शक्य आहे असा वापर पुढील आकृतिबंधाद्वारे शक्य आहे. या आकृतिबंधाचे डिझायनर हे नेहमीच ज्ञाननिर्मितीबद्दल अनभिज्ञ असतात.

प्रत्येक बाह्यस्रोत व्यासपीठ नेटवर्क तंत्रज्ञान प्रकल्प, हा केवळ एका प्रकल्प गट व्यवस्थापकाच्या प्रशासनाखाली चालविला जातो. अशा प्रशासक गटात १ वा २ सदस्य असतात. क्षेत्रतज्ज्ञ व नेटवर्क डिझायनर हे नेटवर्क तंत्रज्ञान विकास प्रक्रियेत सहभागी असतात; पण हेच क्षेत्रतज्ज्ञ जर ज्ञानवापराकरिता त्यांना सोपी पद्धती उपलब्ध करून दिल्यास महत्त्वपूर्ण डाटा निर्मितीकरिता सहकार्य करू शकतात आणि त्यांना






नेटवर्क तंत्रज्ञान डिझायनरचे सहकार्य प्राप्त झाल्यास डाटानिर्मितीस अधिक प्रभावी स्वरूपात मदत करू शकतात. एकूणच वरील आकृतीवरून अशा व्यासपीठांचे स्वरूप व प्रशासन हे सुस्पष्ट होणारे आहे. याच प्रकल्पातील विविध घटकांच्या कार्याचे स्वरूप असे -

### (अ) क्षेत्रतज्ज्ञ

(१) ज्ञान संकलन, त्याची उपलब्धता करणे, चर्चा करणे.
(२) संबंधित निवडलेल्या उपक्रमासंदर्भातील प्रकाशनाचे संग्रहण करणे व त्याचे एकत्रीकरण करणे.
(३) नेटवर्क तंत्रज्ञान डिझायनरनी उपस्थित केलेल्या विशिष्ट प्रश्नांची उत्तरे तयार ठेवणे.
(४) विद्यमान तंत्रज्ञानाबद्दल विचार करून लक्ष्य ठरविणे.
(५) नेटवर्क तंत्रज्ञानाची जाहिरात करणे / प्रसारण करणे व सातत्यपूर्वक नवे शास्त्रीय शोध घेऊन भर टाकणे.

### (आ) तंत्रज्ञान डिझायनर्स

(१) क्षेत्रतज्ज्ञांनी उपलब्ध केलेल्या स्रोतांचा वापर करून त्याचे परिवर्तन नेटवर्क तंत्रज्ञान भाषांमध्ये करणे. (नेटवर्क डाटा)
(२) औपचारिक ज्ञान सादरीकरणाबद्दल चर्चा करणे, त्याचे संपादन करणे, संग्रहण करणे.

### (क) प्रकल्प प्रशासक

(१) नेटवर्क तंत्रज्ञान संबंधित क्षेत्राची उद्दिष्टे तयार करणे.
(२) उपक्रम प्रक्रियेबद्दल चर्चा करणे, समन्वय साधणे व त्याचे नेतृत्व करणे.
(३) तंत्रज्ञानाचा स्रोत प्रकाशित / प्रदर्शित करणे.

## ३. सहयोगी उपक्रम

### स्वरूप आणि व्यवस्थापन

सहयोगी उपक्रमांचे स्वरूप लक्षात घेता व उपभोक्त्यांच्या भूमिकांचा / गरजांचा विचार करता यासाठी सर्वसाधारणपणे पुढील बाबींची आवश्यकता आहे.

(१) विकसित संप्रेषण वाहिन्या (चॅनेल्स), अशा वाहिन्यांची या उपक्रमातील प्रशासक, तज्ज्ञ, अभियंते, डिझायनर्स यांच्या चर्चेकरिता उपलब्धता.
(२) वाचकांची माहिती आणि नेटवर्क, त्याद्वारे तज्ज्ञ अशा विविध क्षेत्रांचे सादरीकरण व तज्ज्ञांकरिता शोध.
(३) सामूहिक उपक्रमांची नियमावली व नेटवर्क तंत्रज्ञान अभियांत्रिकीची तंत्रे यांची उपलब्धता.



(४) सामाजिक जागृती व बदलांची दखल.
(५) माहिती अधिकृतता (अशा माहितीवर संबंधितांची स्वाक्षरी व अधिकृत व्यक्तीकडून साक्षांकित.)
(६) स्वामीत्व कायदा व कॉपीराईट कायदा संदर्भातील नियमावलीची उपलब्धता.

## ४. नेटवर्क तंत्रज्ञान बाह्यस्रोतांचे ज्ञानव्यवस्थापन

सामूहिक वापर उपक्रम तंत्रज्ञानाचे स्वरूप सर्वसाधारणपणे विचारात घेतल्यास, शास्त्रज्ञांना एखाद्या विशिष्ट क्षेत्राकरिता अशा तंत्रज्ञानान उपक्रमांची नितांत आवश्यकता असते. नव्याने निवडलेल्या उपक्रमांसाठी वा प्रकल्पासाठी ते बाह्यस्रोतांचा शोध घेतात. त्यांचे स्वरूप न्याहाळतात आणि त्यांना त्यांच्या गरजांची पूर्तता अशा उपक्रमातून होईल याचा विश्वास वाटताच ते अशा उपक्रमात सहभागी होतात. एखाद्यास प्राथमिक स्तरावर उपक्रम योग्य वाटलाच नाही तर ते स्वतंत्रपणे उपक्रमांची उभारणी करतात व आपोआपच प्रकल्प प्रशासक होतात, ही नेटवर्क तंत्रज्ञान प्रकल्पाची पहिली पायरी असते. अशा सामूहिक उपक्रमात, सर्वांचे सहकार्य ही बाब अत्यंत महत्त्वाची असते. या प्रकल्पाची व्याप्ती, उद्दिष्टे, सामूहिक उद्देश, क्षेत्र यांचे स्वरूप स्पष्ट होते व यानंतर उपक्रमात आवश्यक बाबींची पूर्तता प्रलेख स्वरूपात उपलब्ध केली जाते. पुढील स्तरावर चर्चा, सांख्यिकीय तपशील यांचा संग्रह केला जातो. प्रथमत: हा डाटा ज्ञान स्वरूपात उपार्जित केला जातो. पुढील नियोजन व तात्त्विक विवेचन क्वचित प्रसंगी करून त्याचे संपादन होते. Wiki सारख्या उपक्रमातून प्रलेखांचा शोध हा लेखकाद्वारे घेतला जातो. बाह्यस्रोत तंत्रज्ञान कार्यस्वरूप (जीवनक्रम) पुढील आकृतीद्वारे स्पष्ट होणारे आहे.

पुढील पानावर दिलेल्या आकृतीद्वारे कार्य पार पडत असताना संपादनामध्ये पुढील समस्या आढळतात.

(१) संपर्क संघर्ष निश्चितता,
(२) विस्कळीत स्वरूपातील एकत्रिकरणातील अस्पष्टता,
(३) अधिकृतता व स्रोत प्रकाशन,
(४) पुरेशी दृश्य साधने व तंत्रज्ञान,

वरील समस्यांची वेळीच दखल घेतल्यास अशा प्रकल्पांची यशस्वीता वृद्धिंगत होते. जैविक तंत्रज्ञान, उपकरणे व पद्धती आणि नवनवी ज्ञानक्षेत्रे व त्यांचे नेटवर्क तंत्रज्ञान, स्रोतनिर्मिती यातील अनुभव हे विशेष लक्षणीय व किचकट असतात. एकूणच नव्या शोधक्षेत्राचा प्रसार व नवक्षेत्रनिर्मितीस चालना देण्यास हे सामूहिक उपक्रम उपकारक ठरत आहेत. अशा उपक्रमांची उपलब्धता आपल्या उपभोक्त्यांना करून दिल्यास ग्रंथालये व माहितीक्षेत्राची क्षमता वृद्धिंगत होण्यास मदत होते.






## ५. सामूहिक स्वरूपाचे ज्ञान उपार्जन व वापर

आजकाल तंत्रज्ञानाच्या अवलंबनाने संस्थातंर्गत व बाह्यस्वरूपीय स्रोतावर आधारित माहिती उपलब्ध करण्याकरिता स्वतंत्र पोर्टल सिस्टीम उपलब्ध केलेली असते. भिन्न भिन्न स्थलावरील माहिती संग्रहणासाठी वेब ब्राऊझरच्या साहाय्याने संपर्क साधून ही माहिती उपलब्ध करता येते. संस्थातंर्गत वापराकरिता वेगवेगळ्या विभागांतील माहितीचे संग्रहण हे संस्थेच्या इतर घटकांना उदाहरणार्थ, संस्थाचालक, व्यवस्थापक व इतर कर्मचारी यांना आपल्या विभागातून वापराकरिता उपयुक्त ठरते. यामुळे संस्थेसंदर्भातील व तिच्या कामकाजास उपयुक्त माहिती सामूहिक वापराकरिता सहजपणे उपलब्ध होते.

### उपक्रमाची आवश्यकता

(१) माहिती सहजपणे कामकाजाच्या ठिकाणाहून वितरित करता येते व प्राप्त करता येते.

(२) इतरांशी सहकार्याच्या दृष्टीने व रचनात्मक आयोजन यासाठी अशा माहितीचा वापर करता येतो. सहकारीवर्गाशी याबाबत चर्चा करता येते.

(३) तांत्रिक साधनाद्वारे प्राप्त माहितीचे रूपांतर करता येण्यासाठी वापर होऊ शकतो. उदाहरणार्थ, सी.डी. द्वारे प्राप्त माहिती

(४) संस्थेचे कामकाज गतिमान करण्यासाठी याची उपयुक्तता मोठी असल्याने, उदाहरणार्थ, विविध भागांतील कर्मचारी एकाच प्रकल्पावर काम करत असतील तर त्यांना कामकाजाच्या ठिकाणाहून एकमेकांशी नेटवर्क संपर्काद्वारे माहितीचे आदानप्रदान करता येते. यामुळे वेळ व पैसाही वाचतो व उपक्रमात वेगवेगळ्या पायऱ्यांवर गरजेनुरूप सुधारणा करता येते.

(५) एकमेकांशी अवलंबित कार्याचे स्वरूप व प्रगती एकमेकास प्राप्त झाल्याने सहकार्यातील गती वाढते.

अशा दृष्टीने सामूहिक कार्याचे उपक्रम हे ज्ञानव्यवस्थापनाचे एक उपयुक्त अंग आहे. एक प्रकारे सर्वदूर संपर्कावर आधारित अशा उपक्रमामुळे ज्ञानास वैश्विक स्वरूप प्राप्त होण्यास मदत होते.

## ६. विकिपीडिया (Wikipedia) एक सहयोगी उपक्रम

हा एक सामूहिक उपक्रम असून याचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

### उपक्रमाचे स्वरूप व वैशिष्ट्ये

विकिपीडिया हा अनेक भाषिक सामूहिक ज्ञान वापराचा स्रोत आहे. या स्रोताचा वापर करण्यासाठी या अंतर्गत असलेले संबंधित पृष्ठ निर्देशनाकरिता अधिक माहिती

पुरवितात. सामुदायिक सहकार्याने व सेवाभावांनी सिद्ध झालेला हा स्रोत जागतिक स्तरावरील सहकार्यातूनच तयार झालेला आहे.

या सामूहिक वेबसाईटची स्थापना २००१ साली झाली आणि अल्प काळातच ही एक मोठी विस्तृत अशी संदर्भ साईट म्हणून गणली जाऊ लागली. विद्यमान स्थितीत या अंतर्गत ७५,००० कार्यरत सहभागी आहेत व ते ९,००० लेखांवर काम करत असून हे लेख २५० हून अधिक भाषांमधून उपलब्ध आहेत. दर दिवशी दहा हजारांहून अधिक संपादने व शंभराहून अधिक लेखांची भर यामध्ये घातली जात असून विकिपीडिया अंतर्गत ज्ञानसाठ्याचा विकास होत आहे.

या वेबसाईटला भेट देणाऱ्याकरिता कोणत्याही विशेष शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता नसते. त्यांची प्राथमिक स्वरूपातील भूमिकाही सध्या अस्तित्वात असलेल्या ज्ञानावर आधारित लेखांची भर घालणे एवढीच असते. शैक्षणिकच नव्हे तर सर्व वयोगट, व्यक्ती, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीतील कोणत्याही स्तरातील व्यक्ती या वेबसाईटमध्ये भर घालू शकतात. केवळ संपादकीय पृष्ठ क्लिक करून कोणीही या लेखांचे संपादन करू शकतो. यामध्ये कधीतरीच विशेष स्थिती उद्भवते. तसेच प्रत्येक जण त्यामध्ये कधीही माहिती साठवू शकतो, विकिपीडिया अंतर्गत रचनात्मक सुविधानुसार त्यामध्ये पूरक संदर्भ, उल्लेख निर्देश यांची भर घालू शकतो. यामध्ये माहितीची भर घालताना त्यामध्ये त्रुटी निर्माण होतील व त्यातील माहिती नष्ट होईल अशी कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसते. जेव्हा एखादी व्यक्ती विकिपीडियातील माहितीमध्ये भर घालत असते वा त्यामध्ये आवश्यक ते बदल करत असते, अशा वेळेस मीडिया विकि ही अत्यंत काळजीपूर्वक विकसित केलेली आज्ञावली आपोआपच संपादन दुरुस्त्यांतील चुकांचे सुलभपणे परिवर्तन करत असते. तसेच असे संपादन घडत असताना विकिपीडियाचे इतर संपादक नेहमीच सहकार्य करत असतात, ज्यांद्वारे चुकांची दुरुस्ती त्वरित होते. याकरिता विकिपीडियाने योग्य दर्जावर आधारित संपादन हे धोरण स्वीकारलेले आहे. एखादे वेळेस एखाद्याने असंदर्भीय संदर्भ दिले असतील तर ते स्वीकारले जात नाहीत, ते वगळण्याची सुविधा ठेवलेली आहे.

विकिपीडिया हे सातत्यपूर्वक चाललेले काम असून त्यातील लेख हे अधिकाधिक दर्जेदार होत जातात. ते संकलित असतात. नव्या लेखामध्ये बऱ्याच वेळा चुकीची माहिती असते. यासाठी उपभोक्त्यांनी वाचकांसाठी नेहमीच अधिकृत माहिती प्राप्त करणे आवश्यक असते. कागदावर मुद्रित इतर विश्वकोशांच्या तुलनेत विकिपीडिया हा मिनिटामिनिटाला, सेकंदासेकंदाला अद्ययावत होत असतो हे याचे मूलभूत वैशिष्ट्य आहे.

क्वचित विचारले जाणारे प्रश्न (frequently asked questions) किंवा प्रश्न कोठे विचारावा (Where to ask questions) यांच्या मदतीने संपर्क साधणाऱ्या व्यक्तीस विकिपीडियाचा वापर कसा करावा, त्यामध्ये प्रत्यक्ष भर कशी घालावी याची माहिती उपलब्ध होते.



### ६.१ ट्रेडमार्क्स व कॉपीराईट संदर्भातील धोरण

विकिपीडियास ना नफा विकिपीडिया फाउंडेशन (Non profit Wikipedia foundation) चा नोंदणीकृत ट्रेडमार्क असून या अंतर्गत संपूर्ण संच समूहाने मोफत मजकूर प्रकल्प (Free Content Project) राबविलेला आहे. या सर्व प्रकल्पाकरिता सहभागी होण्यासाठी पुरेसे सक्षम असणे गरजेचे असून स्वत:ला ज्ञानसंपादनप्रक्रियेत सहभागी होता आले पाहिजे. त्याचे स्वरूप सामूहिक स्वरूपाचे असल्याने अशा समूहात कार्यरत राहण्याची तुमची तयारी वा पात्रता असली पाहिजे. विकिपीडियातील सर्व मजकूर, आकृत्या या GNC free Documentation License (GFDC) द्वारे संरक्षित असतात. त्यामुळे आपला सर्व सहभाग हा तुमच्या वैयक्तिक मालकीचा असतो आणि याचबरोबर या लायसन्सद्वारे सर्व मजकूर मोफत वितरित करण्याची व पुनर्वापर करण्याची ग्वाही दिलेली असते. या प्रकल्पामध्ये विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व अनुभवी संपादक हे नव्या सहभागीस विशिष्ट पद्धतीने सर्व ज्ञानकोशात मजकूर नोंदविण्यासाठी मदत करतात. यासाठी स्वतंत्र Manual of Style सिद्ध केलेले आहे.

### ६.२ विकिपीडियाच्या वापराचे स्वरूप

(१) नवीन बदलासंदर्भातील पृष्ठाद्वारे संपर्क करणाऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. शिवाय इतर भाषांतील संदर्भ निर्देशित केले जातात. तसेच दर्जेदार लेख व कोणतेही लेख पाहण्याची स्वतंत्र सोय असून त्यासाठी पोर्टल तयार केलेले आहे. तसेच सर्च बॉक्सचाही शोधासाठी वापर करता येतो.

(२) संशोधन साधन म्हणूनही विकिपीडियाचा वापर करता येतो. कारण यातील लेख हे सातत्यपूर्वक अद्ययावत होतात व अधिकाधिक दर्जेदार बनत जातात. तसेच वापरकर्त्याने यातील सर्वच लेख प्राथमिक स्तरावर ज्ञानकोशाच्या दर्जाचे असत नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे.

(३) विकिपीडियात संदर्भसुविधा असल्याने त्याचा वापर हा मूलभूत व दिशादर्शक असतो. तसेच उपप्रकल्पाशी संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध असते.

### ६.३ विकीपिडीयाची बलस्थाने

(१) कागदावरील मुद्रित प्रकाशनापेक्षा विकिपीडियावरील प्रकाशन किंमत ही कमी असून त्यामध्ये वेळोवेळी बदल व भर घालता येणे शक्य आहे.

(२) विकिपीडिया हा सर्वदूर विस्तृत योगदानासाठी उपलब्ध असलेला स्रोत आहे.

(३) याचे संपादन कोणीही सहजपणे करू शकतो.

(४) विकिपीडिया हा मुक्त आणि पारदर्शक या तत्त्वावर आधारित सिद्ध केलेला असतो. यातील ज्ञान सातत्यपूर्वक अद्ययावत केले जात असते व याची संपर्क सुलभता दर्जेदार आहे.

## ६.४ विकिपीडियातील त्रुटी

(१) यामध्ये स्पष्टपणे महत्त्वाचे लेख कोणते या संदर्भात कोणतीही पद्धतशीर प्रक्रिया उपलब्ध नाही. यामुळे यातील काही मजकुरांकडे दुर्लक्ष होऊ शकते.

(२) काही प्रसंगी काही लेख हे पूर्वग्रहदूषित वृत्तीने लिहिलेले असल्यामुळे ते सर्वव्यापी नसतात व ते सखोलही नसतात.

(३) यातील मजकुराचे कोणीही संपादन करीत असल्याने काही मजकूर हा संशयास्पद व न तपासलेला असा असू शकतो.

(४) यावर सक्षम असे नियंत्रण नसल्याने यामध्ये त्रुटीयुक्त व अनधिकृत मजकूर अंतर्भूत होण्याची शक्यता असते.

(५) विकिपीडियात अनेक सहभागी हे लेखातील निश्चित वा दर्शक संज्ञा याबाबत जागरुक नसतात व ते कोणत्याही स्रोताचा निर्देश न करता माहिती पुरवीत असतात.

(६) विकिपीडियाच्या मुक्त संपर्क धोरणामुळे यातील माहिती सत्यतेपासून दूर जाणारी व यातील विधाने दिशाभूल करणारी असू शकतात.

(७) यावरील सेन्सॉरशिप (प्रसारण नियंत्रण) ही अत्यंत अवघड आहे.

असे असले तरीदेखील या संदर्भातील अभ्यासाद्वारे विकिपीडिया हा स्रोत Encyclopedia Britanica इतकाच विश्वासार्ह आहे, असा निष्कर्ष प्राप्त झालेला आहे.

## संदर्भ


(1) J. Bao. V. Honavar, Collaborative Ontology Building with wiki@nt.A Multi Based Ontology Building Environment, In Proceedings of the 3rd International on Evaluation of Ontology based Tools (EON), Hiroshima 2004, S. 1-10.

(2) www.phil-fak. uni-duesseldorf. de/intowiss/admin/pul daterian/ files/35/1179995073 ges 2007 we. pdf.

(3) Y. Sure A. Tool supported Methodology for Ontology knowledge Management. In H. struckencchmidt, E. Stubkaj C. Schlider (eds). The Ontology & Modelling of Real Estate Transactions, P.P. 115-126, Ashgate 2003.


❑❑❑



# ओपन सोर्स सॉफ्टवेअर : स्वरूप आणि फायदे

डॉ. राजेंद्र कुंभार

*ओपन सोर्स सॉफ्टवेअर म्हणजे काय ? अशा सॉफ्टवेअर्सचा उद्देश, स्वरूप आणि फायदे यांबद्दलची माहिती सदर लेखामध्ये दिली आहे.*

## प्रस्तावना

संगणकाच्या आगमनामुळे औद्योगिक समाजाचे रूपांतर माहितीधिष्ठित समाजामध्ये झाले. समाजाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर माहिती-तंत्रज्ञानाचा उपयोग करणाऱ्या समाजास माहितीधिष्ठित समाज (Information society) असे संबोधले जाऊ लागले. परंतु संपूर्ण मानवजातीच्या उद्धारासाठी केवळ माहितीधिष्ठित समाज असून पुरेसे नाही तर ज्ञानाधिष्ठित समाज (Knowledge society) असावा असा विचार युनेस्कोसारख्या जागतिक संस्थांमध्ये मांडला जात आहे. सर्व नागरिकांना शिक्षणाची समान संधी, विचार आणि संप्रेषण स्वातंत्र्य, माहितीची सर्वांना सहज उपलब्धता आणि सांस्कृतिक विविधतांचे जतन या चार वैशिष्ट्यांच्या आधारे ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मिती शक्य आहे.

समाजातील सर्वांना सहजपणे माहिती उपलब्ध होण्यासाठी माहिती-तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. यासाठी माहिती-तंत्रज्ञान सहजपणे उपलब्ध पाहिजे. सॉफ्टवेअर हा माहिती-तंत्रज्ञानाचा एक महत्त्वाचा घटक आहे. समाजातील सर्व नागरिकांना हवी ती माहिती सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी सॉफ्टवेअर विनामूल्य पुरवावेत असा विचार व्यापक सामाजिक कल्याण चिंतणाऱ्या काही तज्ज्ञांच्या मनात आला. या विचारातूनच ओपन सोर्स सॉफ्टवेअरचा उगम झाला.

## ओपन सोर्स सॉफ्टवेअर म्हणजे काय ?

सॉफ्टवेअर म्हणजे संगणकास सूचना पुरविणारी आज्ञावली. सॉफ्टवेअर म्हणजेच

आज्ञावली ही अत्यंत किचकट, सांकेतिक भाषेत तयार केलेली असते. सामान्य संगणक उपभोक्त्यास फक्त कार्यान्वित झालेली / कार्यरत असलेली आज्ञावली दिसते. प्रत्यक्ष प्रोग्रॅम किंवा सूचनांचा संच दिसत नाही. सॉफ्टवेअर तयार झाल्यावर त्याचा निर्माता ते सेव्ह करतो व ते पुन्हा उघडण्यासाठी विशिष्ट सांकेतिक चिन्हांचा वापर करतो. प्रोग्रॅम उघडण्याकरिता या सांकेतिक चिन्हालाच source code असे म्हणतात. जेव्हा जेव्हा सॉफ्टवेअरमध्ये काही बिघाड होतो तेव्हा तो दुरुस्त करण्यासाठी (म्हणजेच debug करण्यासाठी) सॉफ्टवेअर तज्ज्ञाकडे सोर्स कोड असणे आवश्यक असते.

खाजगी सॉफ्टवेअरचे निर्माते त्यांच्या सॉफ्टवेअरचा सोर्स कोड कोणालाही सांगत नाहीत. परंतु व्यापक समाजहिताचा विचार करणारे सॉफ्टवेअर तज्ज्ञ त्यांच्या सॉफ्टवेअरचा सोर्सकोड सर्वांनाच उपलब्ध करतात. म्हणून सोर्स कोडसह मोफत उपलब्ध असणाऱ्या सॉफ्टवेअरना ओपन सोर्स सॉफ्टवेअर असे म्हणतात. थोडक्यात, ओपन सोर्स सॉफ्टवेअर म्हणजे –

(अ) मोफत / विनामूल्य सॉफ्टवेअर,
(ब) सॉफ्टवेअर बरोबरच सोर्स कोडही उपलब्ध,
(क) सोर्स कोड असल्यामुळे कोणीही अशा सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक असे बदल करू शकतो,
(ड) बदललेले सॉफ्टवेअर इतरांना मोफत उपलब्ध केले जाते,
(इ) असे सॉफ्टवेअर वापरण्यासाठी काही अटींचे पालन करावे लागते. त्याला General Purpose License म्हणतात.

## ओपन सोर्स सॉफ्टवेअरचे फायदे

### (१) विनामूल्य

ओपन सोर्स सॉफ्टवेअर सर्वांना विनामूल्य उपलब्ध असतात. त्यामुळे ज्या संस्थांना सॉफ्टवेअरसाठी निधीची अडचण भासते त्यांना ही सॉफ्टवेअर विनामूल्य उपलब्ध होतात. विशेषत: ग्रंथालयांना सॉफ्टवेअर विकत घेण्यासाठी आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागते. त्यांच्यासाठी ओपन सोर्स सॉफ्टवेअर ही उत्तम सोय आहे.

### (२) सहज प्रसार

ओपन सोर्स सॉफ्टवेअर मोफत उपलब्ध असल्यामुळे त्यांचा प्रसार / वापराचे प्रमाण खूप मोठे असते.

### (३) तज्ज्ञांचा सहभाग

ओपन सोर्स सॉफ्टवेअर तयार करण्यामध्ये अनेक देशांतील तज्ज्ञांचा सहभाग



असतो. त्यामुळे संयुक्त बुद्धिमत्तेचा (collective brain) वापर करून ओपन सोर्स सॉफ्टवेअर तयार होत असते. विविध देशांतील, संस्थांतील सॉफ्टवेअर तज्ज्ञ आपल्या ज्ञानाचा उपयोग ओपन सोर्स सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी करत असतात. त्यामुळे अशा सॉफ्टवेअरमध्ये सातत्याने सुधारणा, बदल केले जातात. त्याचा उपयोग अशा सॉफ्टवेअरचा वापर करणाऱ्यांना होतो.

### (४) आवश्यक ते बदल करणे शक्य

अशा सॉफ्टवेअरचा उपभोक्ता त्या सॉफ्टवेअरमध्ये त्याला हवे ते आणि हवे तसे बदल करू शकतो. म्हणजेच ओपन सोर्स सॉफ्टवेअर customise करता येते, Tailor made करता येते.

## ग्रंथालयांशी संबंधित ओपन सोर्स सॉफ्टवेअर्स

(१) Koha
(२) Greenstone
(३) Dspace
(४) Eprints
(५) Fedora

यांसारखी आणखी अनेक ओपन सोर्स सॉफ्टवेअर्स सध्या उपलब्ध आहेत. यांपैकी Koha हे ग्रंथालयातील दैनंदिन कार्यासाठी उपयुक्त असणारे ओपन सोर्स सॉफ्टवेअर आहे. तर वर नमूद केलेले इतर सॉफ्टवेअर्स ही इलेक्ट्रानिक वाचनसाहित्याच्या व्यवस्थापनासाठी म्हणजेच डिजिटल ग्रंथालयांच्या निर्मितीसाठी व व्यवस्थापनासाठी उपयुक्त आहेत.

## समारोप

ओपन सोर्स सॉफ्टवेअरचा ग्रंथपालांनी आणि ग्रंथालयशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात जास्तीत जास्त वापर करावा. व त्याबद्दलचे अनुभव लेखनाच्या माध्यमातून इतरांपर्यंत पोहचवावेत.

❑❑❑

# University News या नियतकालिकाचे आशय–विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. डॉ. सत्यनारायण बाहेती व शामकांत डगवार

*प्रस्तुत लेखात ग्रंथालये समृद्ध करण्यास ज्या विविध तंत्रांचा वापर प्रभावीपणे केला जातो, अशा तंत्रांपैकी 'आशय–विश्लेषण' हे तंत्र काय आहे, हे शैक्षणिक ग्रंथालयातील ग्रंथपालांना समजून घेता येईल. सोबतच आशय–विश्लेषण तंत्राद्वारे युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकाचे अंतरंग जाणून घेता येईल.*

## (१) प्रस्तावना

आधुनिक ग्रंथालयांत उपभोक्त्यांच्या मागणीला अनुसरून वेगवेगळ्या तंत्रांचा उपयोग सातत्यपूर्ण करणे ग्रंथपालांना भाग पडते. कारण ज्ञान आणि माहिती साधनांच्या प्रकाशनात झालेली अमर्याद वाढ, त्यांचे विस्कळीत स्वरूप व सातत्यपूर्ण संशोधनवृत्ती या पार्श्वभूमीवर ग्रंथसंग्रहाच्या विकासाबरोबरच नियतकालिकांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून दर्जेदार वाचनसाहित्य, संबंधित विषयाला धरून, उपभोक्त्यांच्या मागणीला अनुसरून तसेच वेळेची बचत करून त्याचे नियोजन करणे असा प्रवाह ग्रंथालये समृद्ध करण्यात मोलाची भूमिका पार पाडीत असतात. परंतु त्याकरिता ग्रंथपालाची अभ्यासवृत्ती अतिशय संवेदनशील असावी लागते. त्याकरिता वेगवेगळी तंत्रे आत्मसात करणे व त्यातून उपभोक्त्यांच्या विशेषतः संशोधन कार्याच्या अंगाने त्याच्या वाचन अभिरुचीच्या गरजा पूर्ण करणे, याकरिता महाविद्यालयीन ग्रंथपालांना सदैव तत्पर असणे गरजेचे असते.

## (२) आशय–विश्लेषण : अर्थ

Bernald Berelson म्हणतात की, संज्ञापनातील व्यक्त वा प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ व्यवस्थित व संख्यात्मक वर्णनाचे 'आशय–विश्लेषण' हे एक तंत्र आहे. एखाद्या लेखकाने त्याच्या पुस्तकातील विशिष्ट विषयास कसे हाताळले आहे किंवा लेखकास काय म्हणावयाचे आहे याचे सामान्यतः जे विश्लेषण केले जाते असा शास्त्रदृष्ट्या जास्त सुधारलेला प्रकार किंवा तंत्र म्हणजे 'आशय–विश्लेषण'.



## (३) आशय–विश्लेषण : व्याख्या

३.१ **गुड आणि हॅट :** ''आशय–विश्लेषण हे आशयाच्या गुणधर्माचे विश्लेषण आहे. आशयाच्या विषयानुसार विश्लेषण करावयाचे झाल्यास आशयाचे राजकीय, प्रचारात्मक, शुद्ध सामाजिक, तात्त्विक, संशोधनपर किंवा मनोरंजक असे वर्गीकण करता येईल. यालाच आशयाचे गुणधर्मानुसार विश्लेषण म्हणतात.''

३.२ **पॉलिंग यंग :** ''मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची आणि इतर लिखित किंवा मौखिक भाषाविषयक आणि व्यक्तीद्वारे प्राप्त संशोधन तथ्यांच्या आशयाचे क्रमबद्ध वस्तुनिष्ठ आणि परिणामात्मक वर्णन करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे संशोधन तंत्र म्हणजे 'आशय–विश्लेषण होय.''

३.३ **N. Kalinger :** "The content Analysis in a method for studying & analysing communication in a systematic, objective, quantitative manner to measure variable."

## (४) आशय–विश्लेषणाचे उद्देश

श्री. बोधनकर आणि अलोणी यांनी आशय–विश्लेषणाचे उद्देश खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

४.१ आशय संज्ञापनाच्या दिशेने वर्णन करणे.

४.२ विद्वत्तेचे विकसन कशा प्रकारे होते ते दर्शविणे.

४.३ आशय संज्ञांबाबत राष्ट्रा–राष्ट्रांमधील भिन्नत्व स्पष्ट करणे.

४.४ संशोधन माध्यमे आणि संशोधन पातळीची तुलना करणे.

४.५ अधिष्ठांच्या संबंधात संज्ञापन आशयाची तपासणी करणे.

४.६ संज्ञापन मापदंडाची रचना करणे.

४.७ तांत्रिक स्वरूपाच्या संशोधनकार्यास साहाय्य करणे.

४.८ शैली लक्षणांचे शोधन करणे.

## (५) आशय–विश्लेषण एकक

५.१ **शब्द** : आशय–विश्लेषणातील सर्वांत लहान एकक म्हणजे शब्द. अध्ययन केल्या जाणाऱ्या भाषणात–लेखात, संपादकीयामध्ये किंवा इतर लिखित किंवा मौखिक सामग्रीमध्ये काही विशेष शब्दांची क्रिया प्रमुख प्रतीकांची किती पुनरावृत्ती झाली आहे, हे त्यास वेगळे लिहून किंवा मोजले जाते आणि त्या आधारावर अध्ययन विषय असलेल्या भाषण, लेख इत्यादींच्या संबंधात काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढले जातात.

५.२ **वाक्ये आणि परिच्छेद** : वाक्ये किंवा परिच्छेदासदेखील एकक म्हणून आशय–विश्लेषणासाठी निवडले जाऊ शकते. खऱ्या अर्थाने वाक्ये किंवा परिच्छेद हा शब्दांचाच एक समूह असतो. ज्याद्वारे एक निश्चित विचार प्रतिमानास प्रस्तृत केले जाते. वाक्ये किंवा परिच्छेदांच्या आधारावर भाषण, लेख, इत्यादींच्या आशयाचे विश्लेषण केले जाते.

५.३ **पात्रे** : नाटक, कादंबरी, कथा, सिनेमा, टेलिव्हिजन, इत्यादींमधील पात्रांना आशय–विश्लेषणाचे एकक मानले जाते. शेक्सपियर यांच्या नाटकातील पात्रे किंवा मुन्शी प्रेमचंद यांच्या साहित्यातील पात्रांची आशय–विश्लेषणाचे एकक म्हणून निवड करता येते.

५.४ **भाग** : आशय–विश्लेषणाकरिता एखाद्या भागाची एकक म्हणून निवड करण्यात येते. ग्रंथ, नियतकालिके, लेख, कथा, कादंबरी, भाषणे, आकाशवाणी संपादकीय, वृत्तपत्रातील बातमीचा भाग, इत्यादींमधील एक विशिष्ट भाग एकक म्हणून निवडला जातो.

## (६) आशय–विश्लेषणाचे महत्त्व

नियतकालिकांच्या संदर्भात आशय–विश्लेषण तंत्र अतिशय प्रभावीपणे काम करते. नियतकालिकातील मुद्रित स्वरूपातील तथ्याचे विश्लेषण केले जाते. त्याकरिता विशिष्ट नियतकालिकाचे दर आठवड्याचे, महिन्याचे किंवा वर्षाचे अंक अवलोकन करून त्यामध्ये असणाऱ्या राजकीय, क्रीडा, संगीत, शिक्षण, व्यवस्थापन, कला, आर्थिक, आरोग्य, साहित्य अशा विविध श्रेणी तयार केल्या जातात. त्यातील कोणकोणत्या सदरावर विशेष भर देण्यात आला, याचे विश्लेषण केले जाते आणि त्यावरून ते नियतकालिक क्रीडाप्रधान, आरोग्यप्रधान किंवा साहित्यप्रधान आहे या संदर्भातील निष्कर्ष काढले जातात. माहितीच्या आशयाचे विश्लेषण वर्तमानपत्रे, नियतकालिके यांच्या सोबतच आकाशवाणी, दूरचित्रवाणी यांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात प्रभावीपणे हाताळले जाते.



कारण विविध क्षेत्रांतील घडामोडींच्या संबंधित गुणात्मक तथ्य सामग्रीचे वैधानिक तथ्यात रूपांतर करणे हा आशय–विश्लेषण तंत्राचा मुख्य विषय उद्देश असतो.

आशय–विश्लेषण हे तंत्र ग्रंथालयातील प्रत्येक विभाग व घटकावर सकारात्मक परिणाम साधणारे तंत्र होय. ग्रंथालये आणि माहितीशास्त्राच्या क्षेत्रात आशय–विश्लेषण तंत्र वापराने बौद्धिक स्वरूपाचे गुणात्मक तसेच संख्यात्मक परिणाम बघावयास मिळतात. नियतकालिक व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून अतिशय प्रभावीपणे माहितीची उपलब्धता संशोधकांना करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आशय–विश्लेषणतंत्राद्वारे होत असल्याने University News या नियतकालिकाचे आशय–विश्लेषण केल्यानंतर उच्चशिक्षण क्षेत्राशी निगडित अनेक पैलू जाणून घेता आले.

## (७) आशय–विश्लेषण : उपयोग

१९३०मध्ये अमेरिकन दैनिकांतून परराष्ट्रीय बातम्यांना किती जागा देण्यात येते याचे निरीक्षण करण्यात आले. अमेरिकन नियतकालिकांतून व पुस्तकांतून निरनिराळ्या विषयाला दिल्या जाणाऱ्या जागांबाबतच्या आढळून येणाऱ्या कलांचे (Trends) शास्त्रज्ञांनी अध्ययन केले. या अध्ययनात त्यांनी आशय–विश्लेषणतंत्राचाच उपयोग करून घेतला. या अध्ययनामुळे या तंत्राची उपयुक्तता सिद्ध झाली. मनोविश्लेषणपद्धतीचा उपयोग करून घेतलेल्या अभिलिखित मुलाखतीच्या शास्त्रीय अध्ययनात Herold Laswell यांनी १९३७ मध्ये आशय–विश्लेषणतंत्राचा उपयोग करून घेतल्यामुळे सामाजिक संशोधनातील एक महत्त्वपूर्ण तंत्र म्हणून आशय–विश्लेषणाचे असलेले स्थान आणखीनच पक्के झाले.

प्रचारतंत्राच्या भिन्नभिन्न स्वरूपाचे निर्देशन करण्यासाठी White ने हिटलर व रुझवेल्ट यांच्या भाषणाचे आशय–विश्लेषणतंत्राच्या साहाय्याने अध्ययन केले व राजकीय पुढारी कशा प्रकारे आपल्या अनुयायांना आवाहन करतात, याचे वर्णन केले. हिटलर व रुझवेल्ट हे दोन भिन्न प्रकारचे नेते आपल्या भाषणातून कोणत्या मुद्यावर भर देतात, यावर व्हाईटने प्रकाश टाकला. सामर्थ्य, अर्थ व नीतीविषयक मुद्यांवर या दोन्ही नेत्यांच्या भाषणातून जास्त भर देण्यात येतो. हे दाखवून या मूल्यांबाबत त्याने या दोन नेत्यांचे तुलनात्मक अध्ययन केले.

## (८) University News या नियतकालिकाचे आशय–विश्लेषण

८.१ **युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकाचा ऐतिहासिक आढावा** : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षणावर होणारे संशोधन, उच्च शिक्षणाचे बदलते मापदंड यांचा सांगोपांग विचार करण्याकरिता University Grants

Commission यांच्या सहकार्याने The Association of Indian Universities, New Delhi याची स्थापना सन १९२५ ला करण्यात आली. उच्च शिक्षणावर काम करणारे देश-विदेशातील नामांकित, शैक्षणिक संशोधन संस्था, विद्यापीठे व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये यांमधून उच्च शिक्षणक्षेत्रात चालणाऱ्या कार्याचा सर्वंकष आढावा या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधक, अभ्यासक यांच्या पुढे यावा या हेतूने द असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीने १ फेब्रुवारी १९६३ पासून 'युनिव्हर्सिटी न्यूज' नावाचे शैक्षणिक नियतकालिक सुरू केले. सुरुवातीच्या काळात हे नियतकालिक फारसे नियमित स्वरूपाचे नव्हते. या नियतकालिकातील ८० च्या दशकांपर्यंतचा उच्च शिक्षणावरील आढावा अधून-मधून घेतला जात होता. मात्र १ जानेवारी १९८४ पासून खऱ्या अर्थाने युनिव्हर्सिटी न्यूज हे नियतकालिक साप्ताहिक स्वरूपात प्रकाशित होते आहे.

भारतातील जवळपास ३११ विद्यापीठे १५,६०० च्या वर महाविद्यालये ही विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या अंतर्गत चालविली जातात. या विद्यापीठांत चालणारे संशोधनात्मक कार्य, महाविद्यालयीन स्तरावर उच्च शिक्षण या अंगाने चालणाऱ्या सर्वंकष घडामोडींवर The Association of Indian Universities लक्ष ठेवून असते.

८.२ **अभ्यासाचा उद्देश** : University News या प्रसिद्ध नियतकालिकातून उच्च शिक्षणावर अनेक नामवंत तज्ज्ञ व्यक्तींचे लेख सातत्यपूर्ण प्रकाशित होत असतात. सोबतच उच्च शिक्षणाच्या अंगाने निरनिराळ्या महत्त्वपूर्ण (शैक्षणिक, प्रवेशासंबंधी, नोकरीविषयक) जाहिराती, संपादकीय प्रबंधसूची, दीक्षांत समारंभातील बीजभाषण, कॅम्पस न्यूज या व इतर विभागांना महत्त्वपूर्ण स्थान देण्यात येते. या सर्वांचे त्यांच्या विषयानुसार विश्लेषण करणे हा अभ्यासाचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे.

८.३ **संशोधनपद्धती व तंत्रे** : University News या नियतकालिकाचा आशय-विश्लेषणतंत्राच्या उपयोगाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. University News या नियतकालिकाच्या जानेवारी २००६ ते डिसेंबर २००७ या दोन वर्ष कालावधीतील सलग १०४ उपलब्ध अंकांचे अवलोकन करून त्यांतील उपलब्ध माहितीच्या आधारे संगणकावर Excel च्या माध्यमातून आवश्यक त्या अधिष्ठानुसार त्यांच्या स्वतंत्र श्रेणी तयार करून या आशयाचे संख्यात्मक व गुणात्मक असे विश्लेषण करण्यात आले आहे.

८.४ **युनिव्हर्सिटी न्यूजमधील प्रकाशित सर्व आशयाचा आढावा** : University News हे साप्ताहिक नियतकालिक उच्चशिक्षणक्षेत्रातील कार्याचा आढावा घेणारे एक दर्जेदार नियतकालिक असून या नियतकालिकात पुढील सदरे नियमित स्वरूपात येतात. त्यात संपादकीय, उच्चशिक्षणावरील वेगवेगळ्या विषय-उपविषयांसंबंधात येणारे लेख, विद्यापीठांच्या दीक्षांत सोहळ्याचे बीजभाषण, कॅम्पस न्यूज, दर महिन्याला प्रकाशित होणारे पीएच. डी. प्रबंध तसेच रोजगार, शैक्षणिक संस्था प्रवेश, व्यावसायिक जाहिराती यांचा समावेश असतो. सोबतच नवीन प्रकाशित पुस्तके, देशविदेशातील उच्च शिक्षणक्षेत्रातील वृत्तेही दिलेली असतात.

८.४.१ **संपादकीय** : युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकातील संपादकीय या सदरात त्या आठवड्यात प्रकाशित झालेल्या त्या अंकाबाबत सपादकाने मांडलेली आपली भूमिका स्पष्ट करतात. शिवाय त्या अंकातील एखाद्या विशिष्ट विषयावर प्रकाशित झालेल्या लेखांचा संक्षिप्त हेतू स्पष्ट करतात. त्या अंकात कोणते महत्त्वाचे सदर आहे याचीही माहिती दिली जाते.

८.४.२ **लेखांसंदर्भात** : युनिव्हर्सिटी न्यूज हे मुळातच उच्च शिक्षणावर कार्यरत माहिती देणारे एक प्रभावी व दर्जेदार साप्ताहिक नियतकालिक असून, उच्च शिक्षणाच्या संदर्भाने येणाऱ्या अनेक नानाविध पैलूंच्या संदर्भात या नियतकालिकात लेखांचा समावेश असतो. जसे संगणकशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, कृषिविज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय शास्त्र, इतिहास, भूगोल, माहिती-तंत्रज्ञान, दूरवर्ती शिक्षण, या व इतर महत्त्वपूर्ण विषयाशाखेतील उप-उप विषयांवरील लेखांना प्राधान्याने स्थान दिले जाते. २१व्या शतकातील उच्च शिक्षणाची स्थिती कशी आहे याचा आढावाच या लेखांमधून घेतला जातो. हे सर्वच लेख नामवंत तज्ज्ञांनी लिहिलेले असतात. अभ्यासपूर्ण व संशोधनाच्या संदर्भाने अतिशय महत्त्वपूर्ण उपयुक्त माहिती या नियतकालिकाच्या प्रत्येक अंकातून प्रकाशित केली जाते.

८.४.३ **दीक्षांत समारंभ प्रसंगाचे बीजभाषण** : प्रत्येक भारतीय विद्यापीठ व संशोधन संस्था ह्या आपल्या कार्यक्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार व उल्लेखनीय अशी कामगिरी करणारे विद्यार्थी, संशोधक, सुवर्णपदकाचे मानकरी, आचार्य पदवी मिळविलेले विद्यार्थी यांचा सत्कार सोहळा आयोजित करीत असतानाच प्रत्येक विद्यापीठ व संशोधन संस्था नित्यनेमाने दरवर्षी दीक्षांत समारंभ आयोजित करीत असतात. या दीक्षांत सोहळ्याला नामवंत तज्ज्ञ, संशोधक, पंतप्रधान, राष्ट्रपती, शिक्षणमंत्री, युजीसी, एआयटीसीईचे चेअरमन, कुलगुरू, राज्यपाल, प्रसिद्ध विषयतज्ज्ञ, शास्त्रज्ञ अशा ख्यातनाम व्यक्तींना दीक्षांत

समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलाविले जाते. त्यांनी केलेले भाषण हे बीजभाषण म्हणून विद्यापीठ किंवा संशोधन केंद्रे प्रकाशित करीत असतात. युनिव्हर्सिटी न्यूज हे नियतकालिक या बीजभाषणाला आपल्या अंकात अतिशय महत्त्वपूर्ण असे स्थान देते.

८.४.४ **कॅम्पस न्यूज** : विद्यापीठे व संशोधन संस्थांच्या अंतर्गत ज्या ज्या विषयांचे सेमिनार, कॉन्फरन्स किंवा वर्कशॉप घेतले जातात, अशा सर्व महत्त्वपूर्ण विषयांना युनिव्हर्सिटी न्यूज आपल्या नियतकालिकात महत्त्वपूर्ण स्थान देते. त्यामुळे प्राध्यापक व संशोधक यांना आपआपल्या विषयासंदर्भात कुठे काय चालू आहे याची ताजी माहिती मिळत असते व आपणही असेच सेमिनार, कॉन्फरन्स, वर्कशॉप आयोजित केले पाहिजेत, या संदर्भात त्यांना या नियतकालिकाच्या माध्यमातून प्रोत्साहनच मिळते.

८.४.५ **कम्युनिकेशन** : युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकात उच्च शिक्षणाच्या विविध अंगांनी बौद्धिक संपदा या संकल्पनेतून विविध नामवंत तज्ज्ञांची मते, विचार या नियतकालिकाच्या कम्युनिकेशन या सदराखाली देण्यात येतात; ज्याचा उपयोग विशेषतः संशोधकांना त्यांच्या संशोधनकार्यात बौद्धिक खाद्य म्हणून होऊ शकतो.

८.४.६ **बुक रिव्हू** : या नियतकालिकातून उच्च शिक्षण या अंगाने प्रकाशित होणाऱ्या कुठल्याही नामवंत तज्ज्ञाच्या पुस्तकाचा संक्षिप्त परिचय करून दिला जातो. नवीन प्रकाशित पुस्तकातील आशय प्रकट केला जातो.

८.४.७ **दि थेसीस ऑफ दि मंथ** : भारतात संशोधनाचे काम हे वेगवेगळ्या विषयाच्या अनुषंगाने सातत्यपूर्ण चालू असते. या संशोधनातून वेगवेगळ्या विषयाचे व उपविषयाचे पैलू आपल्यासमोर येत असतात. नव्याने अभ्यास करणाऱ्या संशोधकांना पीएच. डी. च्या माध्यमातून त्यांच्या क्षेत्रात काय काम झाले आहे व कुठले काम व्हायचे राहिले आहे, याचा अंदाज घेता येतो व आपली संशोधन प्रवृत्ती जागृत करून संशोधनाला हातभार लावता येतो. असे झालेले संशोधन भारतातील अनेक विद्यापीठे व संशोधन संस्था त्या संशोधकाचा विषय, त्याचे नाव व विद्यापीठ अशी माहिती दि असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजकडे पाठवीत असते व त्याला युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकातून महत्त्वपूर्ण असे स्थान देते. उदाहरणार्थ, ग्रंथालयशास्त्र, कृषिविज्ञान, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, माहिती-तंत्रज्ञान अभियांत्रिकी, इत्यादी अशा पीएच. डी. संशोधकांची नावे, विषय व विद्यापीठ यांची संक्षिप्त माहिती युनिव्हर्सिटी न्यूजमधून दर आठवड्याला थेसीस ऑफ दि मंथ या सदराखाली प्रकाशित करीत असते. तसेच वार्षिक सूचीसुद्धा या नियतकालिकाच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात येते.

८.४.८ **न्यूज फ्रॉम अ‍ॅब्रॉड** : भारताबाहेर उच्च शिक्षणावर चालणारे सेमिनार, कॉन्फरन्स, वर्कशॉप यांच्या माध्यमातून अनेक विषय, उपविषय यांच्या अनेक पैलूंवर अभ्यासपूर्ण चर्चा घडवून आणली जाते व त्याची संक्षिप्त माहिती युनिव्हर्सिटी न्यूजमध्ये देण्यात येते.

८.४.९ **ए. आय. यू. न्यूज** : दि असोसिएशन ऑफ इंडियन न्यूज, नवी दिल्ली या वैशिष्ट्यपूर्ण सदराखाली युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकातून त्यांनी आयोजित केलेल्या इतर विद्यापीठ व संशोधन संस्था यांच्या सहकार्याने सेमिनार, कॉन्फरन्स, वर्कशॉप ज्यांचा संबंध उच्च शिक्षणाशी आहे अशा अनेक विषय, उपविषयांवर चर्चासत्रे घडवून आणली जातात. याचा मागोवा युनिव्हर्सिटी न्यूजमधून सातत्याने घेतला जातो.

८.४.१० **जाहिराती** : युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकातून उच्च शिक्षण या संदर्भाने भारतीय शैक्षणिक रोजगार क्षेत्रातील, शैक्षणिक प्रवेशासंबंधीचे व शैक्षणिक व्यावसायिक क्षेत्रातील जाहिरातींना प्राधान्याने स्थान दिले जाते. अनेक होतकरू विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक यांना आपल्या विषयासंदर्भातील भारतात कुठे नोकरीविषयक संधी उपलब्ध आहे, या संदर्भातील माहिती युनिव्हर्सिटी न्यूजमधून कळते. तसेच उच्च शिक्षण या अनुषंगाने प्रवेश घेण्यासंदर्भात भारतातील प्रसिद्ध महाविद्यालये, विद्यापीठे व संशोधन केंद्रांची माहिती या नियतकालिकातून मिळते. तसेच विविध शैक्षणिक व्यापारी प्रकाशने ज्यात ग्रंथप्रदर्शने व विक्री, फर्निचर, उपकरणे व इतर साधन-सामग्रीच्यादेखील व्यावसायिक या सदराखाली जाहिराती प्रकाशित केल्या जातात.

## (९) युनिर्व्हसिटी न्यूजमधील आशयाचे त्यांच्या प्रकारानुसार विश्लेषण

### ९.१ युनिर्व्हसिटी न्यूजमधील समाविष्ट सदर

| Sr.No. | Topics | Total Quantity | | Total | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| | | 2006 | 2007 | | |
| 1 | Editorial | 7 | 5 | 12 | 0.34 |
| 2 | Article | 324 | 203 | 527 | 15.35 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | Convoc$^{n}$ Address | 38 | 43 | 81 | 2.79 |
| 4 | Campus News | 199 | 208 | 407 | 11.85 |
| 5 | Communication | 17 | 12 | 29 | 0.84 |
| 6 | Book Review | 10 | 9 | 19 | 0.55 |
| 7 | Thesis of the Month | 327 | 421 | 748 | 22.7 |
| 8 | News from Abroad | 12 | 11 | 23 | 0.37 |
| 9 | AIU News | 10 | 13 | 23 | 0.66 |
| 10 | Advertisement | 843 | 706 | 1549 | 45.12 |

सोबतच्या सारणीमध्ये संपादकीय हे सदर २००६ व २००७ या वर्षात एकूण १२ दिलेले आहेत. तर लेख मात्र दोन वर्षांत ५२७ दिलेले आहेत. प्रबंधांच्या सूचीचे प्रमाण संख्येने दोन वर्षांत ७४८ इतके आहे; तर जाहिराती सर्वांत जास्त म्हणजे १५४९ इतक्या आल्या असून त्यांचे सरासरी प्रमाण ४५.१२% इतके आहे.

## ९.२ Editiorial Review

| VOL/ISSUE NO. | GUEST EDITOR | TOPICS |
|---|---|---|
| 44(1) | S.P.Patil | History of A I U |
| 44(2) | Dayanand Dongaonkar | Higher Education |
| 44(5) | R. P. Singh | Culture of India |
| 44(12) | R. P. Singh | Environment |
| 44(29) | Vijay Khole | Library Science |
| 44(36) | S.P.Tyagrajan | Potential of University |
| 44(48) | Ram Takwale | Indian Higher Education |
| 45(1) | S.S.Katiya | Higher Education |
| 45(2) | Dayanand Dongaonkar | Educational Policy |
| 45(4) | Basudev Chattopadhyay | Teachers Education |
| 45(44) | S.L. Mehta | Environmental Natural Resources Management |
| 45(48) | D.Vishwanathan | Knowledge Century Era |



या सारणीमध्ये Higher Education ला धरूनच संपादकीय आढावा घेण्यात आला असून त्यामध्ये नामवंतांची मते प्रकट झालेली आहेत.

## ९.३ विषयवार लेखांची सूची

| Subject | Quantity | C.F. | Percentage |
|---|---|---|---|
| Higher education | 131 | 131 | 24.85 |
| Education Policy | 73 | 204 | 13.85 |
| Technical Edu. | 45 | 249 | 8.53 |
| Environment Science | 41 | 290 | 7.77 |
| Management & Administration | 35 | 325 | 6.64 |
| General | 33 | 358 | 6.26 |
| History,Geo.,Poly. Sci. | 22 | 380 | 4.17 |
| I.T. | 19 | 399 | 3.6 |
| Library & Information Sci. | 13 | 412 | 2.46 |
| Globalisation | 12 | 424 | 2.27 |
| Language & Literature | 12 | 436 | 2.27 |
| Distance Edu. | 11 | 447 | 2.08 |
| Research Methodology | 10 | 457 | 1.89 |
| Science & Technology | 10 | 467 | 1.89 |
| Sociology | 10 | 477 | 1.89 |
| Economics | 9 | 486 | 1.7 |
| Art | 7 | 493 | 1.32 |
| Human Rights | 7 | 500 | 1.32 |
| Agriculture | 6 | 506 | 1.13 |
| Medical Education | 6 | 512 | 1.13 |
| Value Edu. | 6 | 518 | 1.13 |
| Law | 5 | 523 | 0.94 |
| Philosophy | 4 | 527 | 0.75 |

या नियतकालिकात उच्च शिक्षणावर सर्वाधिक लेख प्रकाशित असून त्यांचे सरासरी प्रमाण २४.८५% इतके आहे. ग्रंथालयशास्त्रावर एकूण १३ लेख २००६ व २००७ मध्ये प्रकाशित झालेले आहे. एकूण २३ विषयांवर या नियतकालिकात लेख प्रकाशित करण्यात आले आहेत.




## ९.४ लेखक उत्तरदायित्व

| No. of Authors | No. of Contribution | Percentage |
|---|---|---|
| ONE | 388 | 76.52 |
| TWO | 91 | 17.94 |
| THREE | 23 | 4.53 |
| MORE THAN THREE | 5 | 0.98 |

एका लेखकाने लिहिलेले एकूण लेख हे ३८८ इतके असून तीनपेक्षा जास्त लेखकांनी मिळून लिहिलेल्या लेखांची संख्या ५ इतकी आहे.






## ९.५ दीक्षांत समारंभाचे बीजभाषण

| YEAR | 2005 | 2006 | 2007 |
|---|---|---|---|
| TOTAL | 18 | 38 | 40 |
| PERCENTAGE | 18.75 | 39.58 | 41.66 |

जानेवारी २००५ ते जून २००५ या कालावधीत झालेल्या दीक्षांत समारंभांना जानेवारी २००६ ते जून २००६ या कालावधीचे अंकांना स्थान दिले असून २००६ व २००७ या वर्षातील दीक्षांत समारंभांना त्याच वर्षात स्थान दिलेले आहे.




## ९.६ Yearwise Campus News

| TOPICS | 2006 | 2007 |
|---|---|---|
| SEMINAR | 73 | 73 |
| CONFERENCE | 49 | 45 |
| WORKSHOP/TRAINING | 51 | 82 |
| AWARDS | 20 | 8 |

इयरवाईज कॅम्पस न्यूजमध्ये सेमिनार हे सदर २००६ व २००७ मध्ये सारखेच म्हणजे ७३ आहे.

## ९.७ Communication

| VOLUME NO. | NO. OF COMMU.REPORT | PERCENTAGE |
|---|---|---|
| 44 | 17 | 58.62 |
| 45 | 12 | 41.37 |

कम्युनिकेशन या बौद्धिक सदराखाली नामवंत तज्ज्ञांचे २ वर्षांत एकूण २९ लेख प्रकाशित झाले आहेत.

## ९.८ Book Review

| VOLUME NO. | BOOK REVIEW | % |
|---|---|---|
| 44 | 10 | 52.63 |
| 45 | 9 | 47.36 |
| TOTAL | 19 | 97.99 |

बुक रिव्ह्यू मध्ये पुस्तक परिचय सन २००६ व २००७ या वर्षांत संख्येने फक्त १९ इतकेच आहे.






## ९.९ The Thesis of The Month

| YEARWISE DISTRIBUTION OF THE SUBJECTS | | | |
|---|---|---|---|
| SUBJECT | 2006 | 2007 | Percentage |
| Agri & Veternary | 259 | 274 | 6.16 |
| Anthropology | 18 | 40 | 0.67 |
| Commerce | 117 | 250 | 4.25 |
| Earth Sci | 97 | 168 | 3.6 |
| Economics | 138 | 243 | 4.4 |
| Education | 136 | 295 | 4.98 |
| Engineering Science & Technology | 300 | 455 | 8.72 |
| Fine Art | 14 | 27 | 0.47 |
| Geography | 49 | 102 | 1.74 |
| History | 123 | 182 | 3.52 |
| Home science | 46 | 131 | 4.2 |
| Journalism & Mass Communication | 4 | 47 | 0.58 |
| Language & Literature | 720 | 1117 | 21.23 |
| Law | 38 | 98 | 1.57 |
| Library & Information Science | 17 | 56 | 0.84 |
| Management | 87 | 189 | 3.19 |
| Mathematical Science | 118 | 157 | 3.17 |
| Medical Science | 144 | 197 | 3.94 |
| Music | 9 | 25 | 0.39 |
| Philosophy | 48 | 49 | 1.12 |
| Physical Science | 584 | 669 | 14.48 |
| Political Science | 0 | 155 | 3.4 |
| Physical Education | 0 | 18 | 0.2 |
| Psychology | 54 | 72 | 1.45 |
| Public Administration | 21 | 44 | 0.75 |
| Religion | 21 | 13 | 0.39 |
| Social work | 7 | 14 | 0.24 |
| Sociology | 106 | 143 | 2.87 |
| Military Science | 12 | 25 | 0.42 |
| **TOTAL** | **3287** | **5255** | |

२९ विषयांवरील प्रबंधांची सूची या नियतकालिकात प्रकाशित झाली असून सर्वात जास्त प्रबंधसूची ह्या Language व Literature वर असून जानेवारी २००६ ते

डिसेंबर २००६ या कालावधीत एकूण १८९७ इतक्या प्रबंधसूची या विषयावर उपलब्ध आहेत. त्या खालोखाल फिजिकल सायन्स वर १२५३ इतक्या प्रबंधसूची उपलब्ध आहेत. तर ग्रंथालय व माहिती शास्त्रावरील प्रबंधसूची ह्या २ वर्षांत संख्येने ७३ इतक्या आहेत.

### ९.१० News from Abroad

| VOLUME NO. | NEWS FROM ABROAD | PERCENTAGE |
|---|---|---|
| 44 | 2 | 15.38 |
| 45 | 11 | 84.61 |

न्यूज फ्रॉम ॲब्रॉड या सदराखाली सेमिनार कॉन्फरन्सचे देशाबाहेरील प्रमाण सन २००६ मध्ये अत्यल्प म्हणजे २ इतके आहे.

### ९.११ AIU News

| VOLUME NO. | A I U NEWS | PERCENTAGE |
|---|---|---|
| 44 | 10 | 43.47 |
| 45 | 13 | 56.62 |

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (A.I.U. News) यामध्ये २ वर्षांत सेमिनार व कॉन्फरन्सचे प्रमाण जवळपास सारखेच असून या नियतकालिकात ते अनुक्रमे २००६ व २००७ मध्ये १० व १३ इतके आहे.

### ९.१२ Advertisements

| Vol.No. | Recruitment | Addmission | Commercial |
|---|---|---|---|
| 44 | 476 | 170 | 197 |
| 45 | 464 | 145 | 97 |

ॲडव्हरटाईजमेंट या सदरामध्ये एकूण ३ भाग असून त्यामध्ये नोकरीविषयक जाहिरातींचे प्रमाण सर्वाधिक २००६ व २००७ मध्ये हे प्रमाण अनुक्रमे ४७६ व ४६४ इतक्या संख्येने आढळून आले.



### निष्कर्ष

(१) युनिव्हर्सिटी न्यूजमधील समाविष्ट १० आशय घटकांपैकी सर्वांत जास्त भर जाहिरातींवर असून यात नोकरीविषयक जाहिरातींवर सर्वाधिक भर दिलेला आहे.

(२) युनिव्हर्सिटी न्यूजमधील 'लेख' या सदरात सर्वाधिक लेख उच्च शिक्षणावर उपलब्ध दिसतात.

(३) ग्रंथालय आणि माहितीशास्त्राला बऱ्यापैकी स्थान नियतकालिकातून मिळाल्याचे दिसते; ज्यामध्ये १३ लेख प्रकाशित झाले आहेत. या नियतकालिकात ३ पेक्षा जास्त लेखकांचे फक्त ५ लेख असून एका लेखकाचे मात्र ३८८ लेख असल्याचे दिसते.

(४) दीक्षांत समारंभ वृत्ताला या नियतकालिकात अतिशय महत्त्वाचे स्थान असून त्यामध्ये होणारे बीजभाषण माहिती-तंत्रज्ञानाच्या अंगाने उच्च शिक्षणावर प्रकाश टाकणारे विविध विषयांवर आधारित होते.

(५) उच्च शिक्षणक्षेत्रामधील महत्त्वपूर्ण विषयांवर प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांचा परिचय ज्याला आपण बुक रिव्ह्यू म्हणतो तो मात्र संक्षिप्त वाटला.

(६) प्रत्येक विद्यापीठाने किंवा महाविद्यालयाने दखल घ्यावी असे थेसिस ऑफ द मंथ हे सदर जे की, आपल्या विषयात आतापर्यंत किती व कोणत्या विषयावर प्रबंधकीय काम झालेले आहे याची महत्त्वपूर्ण माहिती युनिव्हर्सिटी न्यूजमधून मिळते.

(७) देश-विदेशातील उच्च शिक्षणाची देवाणघेवाण करणारे न्यूज फ्रॉम ॲब्रॉड याचा विस्तार मात्र विशेष प्रभावी वाटलेला नाही.

(८) एआययू हे इतर विद्यापीठ, महाविद्यालय यांना सोबत घेऊन विविध सेमिनार, वर्कशॉप, कॉन्फरन्स घेते. हे उच्च शिक्षणाला अनुसरून असून ते अभ्यासकांसाठी उपयुक्त आहे.

(९) युनिव्हर्सिटी न्यूजमधील जाहिरात हे सदर अतिशय महत्त्वाचे वाटले. कारण नोकरीच्या शोधात असलेल्या प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांना देशभरातील नोकरीविषयक संधीचा लाभ या जाहिरातींतून मिळतो. तर प्रवेश सदरामध्ये कुठले अभ्यासक्रम उपयोगाचे आहेत हेही या जाहिरातींतून कळते. शिवाय व्यावसायिक सदरामध्ये विविध संस्था, सरकारी प्रकाशने महाविद्यालयीन व विद्यापीठीय कामकाज, वाचन साहित्य, फर्निचर, उपकरणे व इतर महत्त्वपूर्ण माहिती विशेष उपयोगी पडणारी आहे.

### शिफारशी

(१) ग्रंथालयात सर्व प्रकारचे वाचनसाहित्य सहज उपलब्ध होत असल्याने ग्रंथालय हे उच्च शिक्षणक्षेत्रातील महत्त्वाचे अंग आहे. त्यामुळे ग्रंथालयशास्त्रावरील लेख युनिव्हर्सिटी न्यूजमध्ये जास्त प्रकाशित करण्यात यावे.

(२) बुक रिव्हूमधील ग्रंथपरिचय थोडा विस्ताराने द्यावा.

(३) युनिव्हर्सिटी न्यूज हे नियतकालिक सर्व महाविद्यालयीन व शैक्षणिक ग्रंथालयांनी बोलविले पाहिजे. या संदर्भात एआययूने युजीसीकडे तसा पाठपुरावा करावा.

(४) युनिव्हर्सिटी न्यूजचे सर्व अंक ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध व्हावेत, म्हणजे अभ्यासकांना घरबसल्या अभ्यासता येतील.

(५) युनिव्हर्सिटी न्यूज या नियतकालिकाची अंतर्गत सजावट रंगीत असावी.

(६) दीक्षांत समारंभ बीजभाषणाचे व इतर कार्यक्रमाचे फोटो असावेत.

(७) इंग्रजी आवृत्तीसोबतच हिंदी आवृत्तीदेखील असावी किंवा हिंदी आवृत्ती स्वतंत्र प्रकाशित करावी.

### संदर्भ


(१) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकाशन, २०००, पृ. ३६० ते ३६७.

(२) बोधनकर सुधीर, अलोणी विवेक आणि कुळकर्णी मृणाल, आशय-विश्लेषण तंत्र : सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, २००३, पृ. २३४.

(३) भांडारकर, पु. ल. सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर : म. वि. ग्र. नि. मंडळ, १९७६, पृ. २३५-२३८.

(४) रिसवडकर म.रा., आशय-विश्लेषण, ज्ञानगंगोत्री, २ मार्च २००१, पृ. ७.

(५) University Hand Book, Association of Indian Universities, New Delhi : AIU, 1997.

(६) http://www.indiatogether.org/2004/may/edu.ugc.htm


❑❑❑

## लेखक परिचय


(१) **प्रा. डॉ. सत्यनारायण रा. बाहेती** : श्रीमती ल. रा. तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथे ग्रंथपाल आणि ग्रंथालयशास्त्र विभाग प्रमुख. एकूण तेहतीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव, य. च. म. मुक्त विद्यापीठाच्या बी. लिब., एम. लिब., एम. फिल. शिक्षणक्रमाचे केंद्रसंयोजक व संमंत्रक, पीएच. डी. मार्गदर्शक. महाविद्यालयीन तसेच सार्वजनिक ग्रंथालयाच्या विविध संघटनांचे सक्रिय पदाधिकारी व भरीव कार्य. आठ पुस्तकांचे लेखन, सहा स्मरणिकांचे संपादन व अनुवाद, पस्तीस शोधनिबंध व दोनशेहून अधिक लेख, ग्रंथपरीक्षणे, विविध वर्तमानपत्रे व नियतकालिकांमधून प्रकाशित. ग्रंथालय शास्त्रावरील तीन आंतरराष्ट्रीय, तीस राष्ट्रीय व वीस राज्यस्तरीय परिषदांमध्ये सक्रिय सहभाग. विविध आठ पुरस्कारांनी सम्मानित. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यास मंडळाच्या व अन्य विद्यापीठांच्या विविध समित्यांवर कार्य. विविध ठिकाणी तज्ज्ञ संसाधन व्यक्ती म्हणून आमंत्रित. आकाशवाणीवर अनेकदा व्याख्यानांचे प्रसारण. बालसंस्कार, व्यवसाय मार्गदर्शन, योग, निसर्गोपचार व ॲक्युप्रेशर चिकित्सा, इत्यादी शिबिरांचे आयोजन व मार्गदर्शन. विद्यार्थिप्रिय शिक्षक व अभ्यासक. युजीसी द्वारे स्वीकृत लघू संशोधन प्रकल्प (Minor Research Project) प्रगतिपथावर.

(२) **श्यामकांत डगवार** : श्यामकांत एकनाथ डगवार य. च. म. मुक्त विद्यापीठातून एम. लिब. परीक्षा अकोला केंद्रावरून दिली आहे. यवतमाळ येथील सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ येथे सहायक ग्रंथपाल या पदावर मागील १० वर्षांपासून कार्यरत असून त्यांनी बडोदा व हैद्राबाद येथील भारतीय ग्रंथालय संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनात सहभाग दर्शविला आहे. तसेच राज्यस्तरीय व विदर्भस्तरीय कॉन्फरन्समध्ये सहभाग घेतला आहे. ग्रंथालय चळवळीशी अतिशय जवळचा संबंध असून ते अनेक सामाजिक शैक्षणिक उपक्रमांत क्रियाशील आहेत. युथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया या राष्ट्रीय पदभ्रमण संस्थेच्या यवतमाळ शाखेचे कार्याध्यक्ष आहेत.


इतर लेखकांचा परिचय यापूर्वीच्या अंकांतून प्रसिद्ध झालेला आहे.

# LIB 013
# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी

*संपादक*
डॉ. रमेश वरखेडे

*कार्यकारी संपादक*
डॉ. राजेंद्र कुंभार

*संपादक मंडळ*
डॉ. मधुकर शेवाळे
श्री. प्रवीण घोडेस्वार
डॉ. प्रदीप कर्णिक

*व्यवस्थापक*
डॉ. मधुकर शेवाळे

© २००८
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

*निर्मिती*
श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*मुद्रक*
श्री. अरविंद पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए, नाईस, सातपूर, नाशिक - ७

*प्रकाशक*
श्री. सुरेश कोवळे, प्रभारी कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ
नाशिक - ४२२ २२२.

# ज्ञानगंगोत्री

वर्ष ८ वे | ज्ञानगंगोत्री : मार्च-एप्रिल-मे २००८ | अंक ४

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| ❑ संपादकीय | : | | २ |
| ❑ ग्रंथपालनाची नैतिकता व आचारसंहिता | : | प्रा. श्री. पां. पोतदार | ३ |
| ❑ ज्ञानव्यवस्थापन संस्कृती | : | प्रा.जी.ए. बुवा | १२ |
| ❑ सहयोगी उपक्रम | : | प्रा. जी.ए. बुवा | २२ |
| ❑ ओपन सोर्स सॉफ्टवेअर : स्वरूप आणि फायदे | : | डॉ. राजेंद्र कुंभार | ३३ |
| ❑ University News या नियतकालिकाचे आशय-विश्लेषणात्मक अध्ययन | : | प्रा. डॉ. सत्यनारायण बाहेती व शामकांत डगवार | ३६ |

| | | |
|---|---|---|
| सुट्या अंकाची किंमत | : संस्था रु. ५० | व्यक्ती : रु. ३० |
| वार्षिक वर्गणी | : संस्था रु. २०० | व्यक्ती : रु. १२० |

मागील अंक उपलब्धतेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक' या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**वर्गणी व व्यवस्थापन** - डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी)** - डॉ. राजेंद्र कुंभार, २, अंकित, लिटल हार्ट, स्वामी समर्थ गार्डनजवळ, निर्मला कॉन्व्हेंटच्या पाठीमागे, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.

● या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.